दैनिक
अहिल्यानगर | पुणे | छत्रपती संभाजीनगर | बीड | धाराशिव | नाशिक येथून दररोज प्रसिध्द
# राष्ट्र सह्याद्री
संपादक : काकासाहेब नवले I RNI No. MAHMAR/2019/82605 I वर्ष ७ वे I पाने ८ I मुल्य रू. ४.०० I अंक ३१६ I रविवार ३० ऑगस्ट २०२६
I पोस्टल परवाना : G-2/Rashtra Shyadri/RNP/2025-26 I www.rashtrasahyadri.com

# हे शेवटचं आंदोलन; आता माघार नाही!



## अंतरवालीतून जरांगेंचा पुन्हा एल्गार



- मुंबईची तारीख १२ सप्टेंबरला जाहीर करणार
- मराठा आरक्षणासाठी आमरण उपोषण सुरू

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**जालना :** मराठा आरक्षण, कुणबी प्रमाणपत्र आणि जात पडताळणीच्या प्रश्नावरून राज्यातील वातावरण पुन्हा तापले आहे. अंतरवाली सराटी येथे मनोज जरांगे पाटील यांनी आजपासून आमरण उपोषणाला सुरुवात करत सरकारविरोधात पुन्हा एल्गार पुकारला. 'हे शेवटचं आंदोलन आहे. मागण्यांमध्ये एकही माघार नाही,' असा निर्धार व्यक्त करत त्यांनी लवकरच मुंबईकडे कूच करण्याची घोषणा केली. मुंबई आंदोलनाची निश्चित तारीख येत्या १२ सप्टेंबरला जाहीर करू, असे त्यांनी सांगितले.

मराठा-कुणबी आणि कुणबी-मराठा जात प्रमाणपत्रासाठीच्या वंशावळ जुळवणी समितीला सरकारने आणखी एक वर्षाची मुदतवाढ दिली असतानाच जरांगे पाटील यांनी उपोषण सुरू केले आहे. पहिल्याच दिवशी अंतरवाली सराटी येथे मोठ्या संख्येने मराठा समाजबांधव जमा झाले. राज्याच्या विविध भागांतून समर्थक आंदोलनस्थळी दाखल होत असून आगामी **(पान ४ वर)**

### '५८ लाख नोंदींवर तत्काळ कुणबी प्रमाणपत्र द्या'

- ५८ लाख नोंदींवर तत्काळ कुणबी प्रमाणपत्र देण्याची मागणी.
- कुणबी प्रमाणपत्र घेतलेल्यांना जात वैधता देण्याची मागणी.
- हैदराबाद गॅझेटनुसार मराठवाड्यातील मराठ्यांना प्रमाणपत्र द्यावे.
- औंध, पुणे व सातारा गॅझेटिअरच्या जीआरची अंमलबजावणी करावी.

### ट्रॅक्टर-रिक्षातून अंतरवालीकडे कूच

**मनोज जरांगे पाटील यांच्या आमरण उपोषणाला पाठिंबा देण्यासाठी धाराशिव जिल्ह्यातील मराठा समाजबांधव ट्रॅक्टर आणि रिक्षा घेऊन अंतरवाली सराटीकडे रवाना झाले. 'मनोज जरांगे पाटील यांचा जीव आमच्यासाठी सर्वांत महत्त्वाचा आहे. ते सांगतील तो निर्णय आम्हाला मान्य आहे,' अशी भावना समर्थकांनी व्यक्त केली. सरकारने ५८ लाख नोंदी दिल्या असल्या तरी त्यानंतर जात पडताळणीच्या प्रक्रियेत अडथळे येत असल्याचा आरोपही समर्थकांनी केला. आंदोलनस्थळी मोठ्या संख्येने सहभागी होण्यासाठी विविध जिल्ह्यांतून मराठा बांधव रवाना होत आहेत.**

### आंदोलनाला जात असतानाच काळाचा घाला



मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्वाखाली अंतरवाली सराटी येथे सुरू झालेल्या आंदोलनात सहभागी होण्यासाठी जात असलेल्या बीड जिल्ह्यातील एका समर्थकाचा रस्त्यातच हृदयविकाराच्या धक्क्याने मृत्यू झाला. सुग्रीव बापू शिंदे (रा. नांदूर घाट, ता. केज, जि. बीड) असे मृत समर्थकाचे नाव आहे. शिंदे हे सहकाऱ्यांसह अंतरवाली सराटीकडे जात होते. गेवराईजवळ वाहन आले असताना त्यांना अचानक हृदयविकाराचा धक्का आला. त्यातच त्यांचा मृत्यू झाला. या घटनेमुळे आंदोलनासाठी अंतरवालीकडे निघालेल्या समर्थकांमध्ये हळहळ व्यक्त होत आहे.

### वकिलाची गोळ्या घालून हत्या

# नेवासातील सात जणांना जन्मठेप

## १३ वर्षानंतर निकाल : पुराव्याअभावी पाच निर्दोष

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** नेवासा येथील ॲड. रियाज पठाण खून खटल्यात प्रधान जिल्हा व सत्र न्यायाधीश एस. बी. कचरे यांनी सात आरोपींना मरेपर्यंत जन्मठेपेची शिक्षा सुनावली. तर पुराव्या अभावी पाच आरोपींची निर्दोष मुक्तता केली. १६ सप्टेंबर २०१३ रोजी नेवासा तहसील कार्यालयाच्या आवारात ॲड. पठाण यांची गोळ्या झाडून हत्या केली होती. तब्बल १३ वर्षानंतर या खटल्याचा निकाल लागला. खटल्यात सरकार पक्षातर्फे बाजू मांडणाऱ्या विशेष सरकारी वकील ॲड. उज्वल निकम यांनी ही माहिती दिली.

### येरवडा तुरुंगात असताना रचला कट !

**सन २०१२ मध्ये औरंगाबाद न्यायालयातील अण्णा लष्करे खून प्रकरणात ॲड . पठाण यांनी साक्ष दिली होती. यात त्यांना फितूर घोषित केले होते. मात्र वृत्तपत्रातील बातमी वाचून ॲड . पठाण हे फिर्यादीच्या बाजूने बोलले, असा अण्णा लष्करे गँगचा गैरसमज झाला. याच रागातून पुण्यातील येरवडा कारागृहात असलेल्या सोपान गाढे व त्याच्या साथीदारांनी ॲड . पठाण यांच्या हत्येचा कट रचला.**

या खटल्याची सविस्तर माहिती अशी की, दि. १६ सप्टेंबर २०१३ रोजी दुपारी पावणेतीन ते तीन वाजण्याच्या सुमारास ॲड. रियाज पठाण हे नेवासा येथील तहसील कार्यालय, पोलीस ठाणे व नोंदणी उपनिबंधक कार्यालयाच्या आवारात एका लिंबाच्या झाडाखाली दस्त नोंदणीचे काम करत बसले होते. त्यावेळी आरोपींनी त्यांच्यावर पाळत ठेवली होती. आरोपी प्रवीण खरचंद याने पाठीमागून येऊन ॲड. पठाण यांच्यावर पिस्तुलातून तीन गोळ्या झाडल्या. त्याच्या इतर तीन सहकाऱ्यांनी पठाण यांचे दोन्ही हात घट्ट धरून ठेवले होते. तर उर्वरित आरोपी त्यांना गोळ्या झाडण्यासाठी चिथावनी देत होते.

**जन्मठेप झालेले आरोपी :** **प्रवीण पोपट खरचंद, मोहन सुरेश लष्करे (फरार), रामेश्वर भगवान गाढे, चौरंगीनाथ गोरक्षनाथ लष्करे, पवन सोमनाथ नरुला, सचिन चंदू चव्हाण, सादिक बशीर शेख,**

**निर्दोष सटका झालेले :** **अशोक जालिंदर जगताप, सत्यवान धनराज सोनकांबळे उर्फ लष्करे, विलास पोपट जिरे, सोपान भगवान गाढे, सुनील मोहन परदेशी.**

या घटनेनंतर ॲड. पठाण रक्ताच्या थारोळ्यात कोसळले. उपस्थित प्रत्यक्षदर्शी अशीफ शेख व इतरांनी त्यांना रुग्णालयात हलविले. मात्र डॉक्टरांनी त्यांना उपचारापूर्वीच मृत घोषित केले. दरम्यान घटनेनंतर पळून जाण्याच्या प्रयत्नात असलेल्या मुख्य आरोपी प्रवीण खरचंद याला नेवासा पोलिसांनी घटनास्थळीच पिस्तुलासह रंगेहात पकडले होते. अशीफ पठाण यांच्या फिर्यादीवरून नेवासा पोलीस ठाण्यात याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला होता. या गाजलेल्या खटल्यात सरकार पक्षातर्फे एकूण २९ साक्षीदार तर बचाव पक्षातर्फे ३ साक्षीदार तपासण्यात आले.

विशेष सरकारी वकील उज्वल निकम यांनी मांडलेला भक्कम युक्तिवाद आणि प्रत्यक्षदर्शींच्या साक्षीच्या आधारे न्यायालयाने ७ आरोपींना दोषी ठरवत मरेपर्यंत जन्म ठेपेची शिक्षा सुनावली. या खटल्यात सरकार पक्षाला ॲड. परिमल फळे आणि भैरवी अधिकारी तथा पोलीस हवालदार महेश जोशी यांनी सहकार्य केले.

# 'सीए' पास झालो पण बँकिंगमध्ये नापास झालो

## माजी आ. भानुदास मुरकुटे यांची कबुली : अशोक बँकेवर रिझर्व बँकेचे निर्बंध

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर :** कर्जदारांनी वेळेवर कर्ज भरले नाही, त्यात कर्ज वसुलीची प्रक्रिया ही क्लिष्ट आणि वेळ खाऊपणाची आहे तसेच ज्या कर्जदारांनी पैसे थकवले त्यांनीच बँकेबद्दल अफवा पसरवल्या. त्यामुळे रिझर्व बँकेने अशोक बँकेवर निर्बंध लादले. आता बँकेतील पैशाच्या व्यवहारावर बंधने आली आहे. ठेवीदारांना त्यांचे पैसे मागे देता येणार नाहीत. या सर्व परिस्थितीला संचालक मंडळ किंवा पदाधिकारी जबाबदार नसून माझ्यासह बँकेचे अधिकारी, कर्मचारी या परिस्थितीला जबाबदार आहेत. माझ्याकडून दुर्लक्ष झाले. त्यामुळे मी 'सीए'ची परीक्षा पास झालो असलो तरी बँकेची परीक्षा मात्र नापास झालो, अशी कबुली अशोक बँकेचे सर्वे सर्वा माजी आमदार भानदास मुरकुटे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

आर्थिक व व्यवस्थापनातील घडामोडींमुळे भारतीय रिझर्व्ह बँकेने (आरबीआय) अशोक सहकारी बँकेवर निर्बंध लादले आहेत. 'आरबीआय'ने निर्देशित केलेल्या नियमाप्रमाणे अशोक बँकेवर काल, शुक्रवारपासून पुढील ६ महिन्यांसाठी निर्बंध लागू केले आहेत.

त्यामुळे 'अशोक'च्या ठेवीदारांमध्ये खळबळ उडाली असून हे वृत्त समजताच बँकेच्या शाखांबाहेर ठेवीदारांनी गर्दी केली. अशोक बँक ही सनदी लेखापाल असलेले श्रीरामपूरचे माजी आमदार भानुदास मुरकुटे यांच्या



अधिपत्याखाली आहे. अशोक बँकेचे मुख्यालय श्रीरामपूर शहरात असून अहिल्यानगर जिल्ह्यासह, पुणे, मुंबई येथे एकूण १३ शाखा आहेत. १९९७ मध्ये स्थापन झालेल्या बँकेचे १० हजारावर सभासद आहेत.

'आरबीआय'ने जारी केलेल्या विनियमन अधिनियम १९४९ मधील कलम ३५ -अ सह कलम ५६ अंतर्गत हे निर्देश जारी केले आहेत. त्यानुसार 'आरबीआय'च्या लेखी पुर्व परवानगीशिवाय बँकेला कोणतेही नवीन कर्ज किंवा आगाऊ रक्कम मंजूर करणे अथवा जुन्या कर्जाचे नूतनीकरण करता येणार नाही. नवीन गुंतवणूक करता येणार नाही. कर्ज घेणे किंवा अन्य प्रकारे आर्थिक दायित्व निर्माण करता येणार नाही. नवीन ठेवी स्वीकारता येणार नाहीत. कोणतेही पैसे देणे मान्य करता मान्य करता येणार नाही. बँकेच्या दायित्वाची पूर्तता करण्यासाठी किंवा **(पान ४ वर)**

### 'आरबीआय'ने पूर्वसूचना दिली होती

आरबीआय'ने निर्बंध लागू करण्याचे कारण स्पष्ट करताना पत्रात म्हटले की, बँकेच्या अलीकडच्या महत्त्वाच्या घडामोडीमुळे निर्माण झालेल्या पर्यवेक्षणासंबंधी चिंतेमुळे हे निर्देश जारी करण्यात आले आहेत.




ठेवीदाराच्या हिताचे संरक्षण करण्यासाठी 'आरबीआय'ने बँकेच्या संचालक मंडळ आणि व्यवस्थापनाशी अलीकडच्या काळात चर्चा केली होती. बँकेच्या कामकाजात सुधारणा करण्यासाठी प्रयत्न करण्यास सांगण्यात आले होते. मात्र बँकेकडून याबाबत ठोस पुरेसे प्रयत्न झाले नसल्याने ठेवीदारांच्या हिताच्या संरक्षणासाठी निर्देश जारी करणे आवश्यक झाले होते, असे आरबीआयने म्हटले आहे.

## मराठी सक्ती विरोधातील याचिका फेटाळली

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**मुंबई :** रिक्षा, टॅक्सी आणि ॲपआधारित कॅब चालकांना मराठी भाषा शिकण्याची सक्ती करू नये, अशी मागणी करणारी जनहित याचिका मुंबई उच्च न्यायालयाने शनिवारी फेटाळली. मोहम्मद कासीम अहमद यांनी अधिवक्ता शुक्ला यांच्यामार्फत ही याचिका दाखल केली होती.

चालकांना मराठी शिकण्याची सक्ती करणे अन्यायकारक असून त्यामुळे त्यांना व्यवसाय करताना अडचणी निर्माण होतील, असा युक्तिवाद याचिकाकर्त्यांच्या वतीने करण्यात आला. या याचिकेला मराठी एकीकरण समितीने विरोध केला.

समितीच्या अधिवक्त्यांनी महाराष्ट्राची अधिकृत भाषा मराठी असल्याचे न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले. यासाठी १९६४ च्या महाराष्ट्र अधिकृत भाषा अधिनियमाचाही संदर्भ देण्यात आला. महाराष्ट्रातील मराठी नागरिकांच्या भाषिक हक्कांसाठी रिक्षा आणि टॅक्सी चालकांना मराठीचे व्यवहार्य ज्ञान असणे आवश्यक असल्याची भूमिका समितीने मांडली. चालकांना मराठी शिकण्यासाठी शासनाने आधीच वेळ दिला आहे. तसेच त्यांना एक **(पान ४ वर)**

## पुण्यात तीन बांगलादेशी नागरिकांना अटक

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**पुणे :** अचूक गुप्त माहितीच्या आधारे पुणे विशेष शाखा (SB) आणि मिलिटरी इंटेलिजन्स (MI), पुणे यांनी गुरुवारी (दि. २७ ) दुपारी एक मोठी कारवाई केली . पुणे शहरात बेकायदेशीरपणे राहत असलेल्या तीन बांगलादेशी नागरिकांना ताब्यात घेतले. या कारवाईमुळे पुणे शहरासह संपूर्ण राज्यात एकच खळबळ उडाली आहे.

याबाबत पोलीस सूत्रांकडून समजलेली सविस्तर माहिती अशी की, मिलिटरी इंटेलिजन्सने विकसित केलेल्या कारवाईयोग्य माहितीवरून सुरक्षा दलांनी २७ ऑगस्ट २०२६ रोजी दुपारी सुमारे ३:०० वाजता छापा टाकला. या संयुक्त कारवाईत संशयितांना कोणतीही संधी न देता तिन्ही व्यक्तींना तात्काळ अटक करण्यात आली. त्यांची ओळख सोनिया अख्तर, मोतियार गाजी आणि सोनिया मोती पान अशी झाली आहे. अशी नावे त्यांनी पोलिसांना सांगितली. प्राथमिक चौकशी आणि देशात बेकायदेशीर प्रवेश केल्याचे सत्यापित झाल्यानंतर, अधिकाऱ्यांनी तिन्ही संशयितांविरुद्ध स्थानबद्धतेचे आदेश जारी केले जात असल्याचे स्पष्ट केले. औपचारिक हद्दपारीची **(पान ४ वर)**

कै.एकनाथ काशिनाथ मिसाळ
(निवृत्त मंडळाधिकारी)



उद्या प्रथम पुण्यस्मरण
सोमवार, दि.३१ ऑगस्ट २०२६ रोजी
ठिकाण : मुकुंद-राजलक्ष्मी मंगल कार्यालय सोनई (सोनई-खरवंडी रोड) येथे होईल.
या वेळी ह.भ.प उद्धव महाराज मंडलिक (नेवासेकर) यांची किर्तन सेवा होईल.
आपले नम्र
अलका एकनाथ मिसाळ (पत्नी)
श्री. दिपक एकनाथ मिसाळ (मुलगा)
(शनिकृपा ट्रेडिंग कंपनी, घोडेगाव)
श्री. गणेश एकनाथ मिसाळ (मुलगा)
अपर जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा,वांद्रे
श्री. अविनाश एकनाथ मिसाळ (मुलगा)
उपअधीक्षक भूमि अभिलेख, अहिल्यानगर
श्री. मयुर वाल्मीकराव सानप (जावई)
(कार्यकारी अभियंता सिडको, नवी मुंबई)
सौ. कोमल मयूर सानप (मुलगी)
श्री. गोपीनाथ काशिनाथ मिसाळ (भाऊ)
श्री. डॉ. मारुती रघुनाथ मिसाळ (चुलत भाऊ)
श्री. ज्ञानदेव रघुनाथ मिसाळ (चुलत भाऊ)
श्री. राजेंद्र गोपीनाथ मिसाळ (पुतण्या)
श्री. सोमनाथ गोपीनाथ मिसाळ (पुतण्या)
गं.भा. चंद्रभागा लहानू पालवे (बहिण, कडगाव)
सौ.द्वारकाबाई विठ्ठल तांदळे (बहिण, अहिल्यानगर)
सौ. गंगाबाई दिलीप तांदळे (बहिण, पुणे)
सौ. लताबाई अशोक चौधरी (बहिण, कांगोणी)
किर्तन सेवा
ह.भ.प.उद्धव महाराज मंडलिक
(सोमवार, दि.३१ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी १० ते १२)



पत्रकार - गणेश खंडागळे, शनिशिंगनापूर, ता. नेवासा, जि.अहिल्यानगर
संकलन : गणेश खंडागळे, सोनई

# नेपाळ : महाप्रलयात महाराष्ट्राचे ६० जण बेपत्ता!

## नेपाळ-तिबेटमध्ये अडकलेल्या ४०४ पर्यटकांपैकी ३३८ जण सुरक्षित; ३७ जण भारताच्या दिशेने रवाना

- बेपत्ता नागरिकांच्या शोधासाठी राज्य सरकारचा परराष्ट्र मंत्रालयाशी समन्वय
- तिबेटमध्ये १४९ भारतीयांची यादी महाराष्ट्राकडे

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**मुंबई :** नेपाळमध्ये २६ ऑगस्ट रोजी आलेल्या भीषण महापुराने मोठ्या प्रमाणात विध्वंस घडवून आणला असून शेकडो जणांचा मृत्यू आणि हजारो नागरिक बेपत्ता असल्याच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्राचीही चिंता वाढली आहे. नेपाळ-तिबेट परिसरात अडकलेल्या महाराष्ट्रातील ४०४ पर्यटकांपैकी ३३८ जण सुरक्षित असल्याची खात्री प्रशासनाने केली आहे; मात्र ६० नागरिकांशी अद्याप थेट संपर्क होऊ शकलेला नाही. यामुळे त्यांच्या कुटुंबीयांची चिंता वाढली आहे.

राज्य सरकारच्या अहवालानुसार, नेपाळ-तिबेट भागात अडकलेल्या महाराष्ट्रातील पर्यटकांच्या सुरक्षिततेसाठी राज्य प्रशासन परराष्ट्र मंत्रालयाच्या नियंत्रण कक्षाशी सातत्याने संपर्कात आहे. सुरक्षित असलेल्या नागरिकांपैकी ३७ जणांचा एक गट तिबेटमधील सागा येथून भारताच्या दिशेने रवाना झाला असून त्यांना परत आणण्याची प्रक्रिया सुरू आहे.

दरम्यान, मुंबईतील एका ट्रॅव्हल कंपनीमार्फत नेपाळला गेलेल्या ६० पर्यटकांशी अद्याप संपर्क होऊ शकलेला नसल्याची माहिती समोर आली आहे. प्रशासनाकडून या गटाचा शोध घेण्यासाठी परराष्ट्र मंत्रालयाच्या मदतीने प्रयत्न सुरू आहेत.परराष्ट्र मंत्रालयाने चीन/तिबेट परिसरात सध्या सुरक्षित असलेल्या १४९ भारतीय नागरिकांची यादी महाराष्ट्र सरकारला दिली आहे. हे नागरिक महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांतील असल्याने ही यादी संबंधित जिल्हाधिकाऱ्यांकडे पाठविण्यात आली आहे. जिल्हा प्रशासनामार्फत या नागरिकांची ओळख पटवून त्यांच्या कुटुंबीयांशी संपर्क साधण्याचे काम सुरू आहे.

राज्य सरकारच्या आपत्कालीन कार्य संचालन केंद्राकडून परराष्ट्र मंत्रालयाच्या नियंत्रण कक्षाशी समन्वय साधला जात असून बाधित भागातील परिस्थितीची माहिती सातत्याने घेतली जात आहे.

दरम्यान, ऑनलाइन लिंकद्वारे आणखी सहा नागरिकांविषयी माहिती प्रशासनाला मिळाली आहे. मात्र त्यांच्याशीही अद्याप थेट संपर्क प्रस्थापित झालेला नाही. त्यामुळे प्रशासनाकडून उपलब्ध माहितीच्या आधारे त्यांचा ठावठिकाणा शोधण्याचे प्रयत्न सुरू आहेत.

नेपाळ आणि तिबेट परिसरात अडकलेल्या भारतीय नागरिकांना सुरक्षित बाहेर काढण्यासाठी आवश्यकतेनुसार बचाव पथके तैनात करण्यात आली आहेत. राज्य सरकारकडून मिळणाऱ्या प्रत्येक नव्या माहितीच्या आधारे बेपत्ता नागरिकांचा शोध आणि त्यांच्या कुटुंबीयांशी संपर्क साधण्याचे काम वेगाने सुरू आहे. महापुरामुळे नेपाळ-तिबेट परिसरातील संपर्क **(पान ४ वर)**

# वाढते गुन्हे आणि गुन्हेगार तुरुंग मात्र अपुरे!

विशेष संपादकीय
करण नवले (संपादक)

राज्यातील कारागृहांची दारे आता बंदिवानांसाठी अपुरी पडू लागली आहेत, ही केवळ कारागृह प्रशासनाची समस्या नाही; ती राज्याच्या संपूर्ण फौजदारी न्यायव्यवस्थेसमोरील गंभीर इशारा आहे. ३१ जुलै २०२६ रोजी राज्यातील कारागृहांची अधिकृत क्षमता २७ हजार ५०४ असताना प्रत्यक्षात ४० हजार ४१२ बंदी होते. म्हणजे क्षमतेपेक्षा तब्बल १२ हजार ९०८ बंदी अधिक! प्रत्येक शंभर जागांमागे १४७ बंदी असतील, तर कारागृह हे सुधारगृह न राहता गर्दीचे केंद्र बनण्याचा धोका निर्माण होतो.

यातील सर्वाधिक चिंताजनक बाब म्हणजे मुंबई, ठाणे, येरवडा यांसारख्या मोठ्या मध्यवर्ती कारागृहांची स्थिती. मुंबई मध्यवर्ती कारागृहाची क्षमता ९९९ असताना तेथे ३ हजार २१९ बंदी आहेत. येरवाड्यात २ हजार ७७७ जागांसाठी ६ हजार ९६९, तर ठाण्यात १ हजार १४१ जागांसाठी २ हजार ८०३ बंदी आहेत. ही आकडेवारी केवळ 'जेल ओव्हरक्राउडिंग' दाखवत नाही; ती पोलिस, न्यायालय, सरकारी वकील, कारागृह आणि पुनर्वसन व्यवस्था यांच्यात कुठेतरी मोठी कडी कमकुवत असल्याचे सांगते.

याहून महत्त्वाचे म्हणजे राज्यातील एकूण बंदींपैकी ८३.३ टक्के बंदी न्यायाधीन आहेत. म्हणजेच प्रत्येक पाच बंदींपैकी चार जण अद्याप दोषी ठरलेले नाहीत. २०२४ च्या राष्ट्रीय कारागृह आकडेवारीतही महाराष्ट्रात ८० टक्क्यांहून अधिक बंदी न्यायाधीन असल्याचे आणि कारागृहांची व्याप्ती १४३.९ टक्क्यांवर असल्याचे समोर आले होते.

म्हणूनच प्रश्न फक्त 'गुन्हेगार वाढले म्हणून तुरुंग भरले' एवढाच नाही. गुन्हे नोंदविण्याचे प्रमाण, तपासाचा वेग, जामीन प्रक्रिया, न्यायालयीन विलंब, दोषसिद्धीचे प्रमाण आणि कारागृह व्यवस्थापन, या सर्वांचा एकत्रित विचार करावा लागेल. राज्यात नवीन फौजदारी कायदे लागू झाले आहेत. भारतीय न्याय संहिता, भारतीय नागरिक सुरक्षा संहिता आणि भारतीय साक्ष्य अधिनियम यांच्या माध्यमातून तपास अधिक तंत्रज्ञानाधारित आणि न्यायप्रक्रिया अधिक गतिमान करण्याचा प्रयत्न आहे. महाराष्ट्र पोलिसांच्या माहितीनुसार डिजिटल एफआयआर, झडती व जप्तीचे चित्रीकरण आणि न्यायवैद्यक पुराव्याचा अधिक वापर यावर भर देण्यात येत आहे. केंद्र सरकारनेही एफआयआरपासून दोषसिद्धीपर्यंतची प्रक्रिया वेगवान करण्यासाठी ई-अभियोजन आणि ई-न्यायवैद्यक प्रणालीवर भर दिला आहे. परंतु कायदे बदलले म्हणून गुन्हेगारी कमी होत नाही. कायद्याची भीती निर्माण करण्यासाठी कायद्याची अंमलबजावणी निश्चित, जलद आणि निष्पक्ष असणे आवश्यक आहे. गुन्हेगाराला पकडले, परंतु तपासातील त्रुटीमुळे तो सुटला, तर पोलिसांच्या मेहनतीवरच प्रश्नचिन्ह निर्माण होते. दुसरीकडे किरकोळ स्वरूपाच्या गुन्ह्यातील आरोपी दीर्घकाळ न्यायाधीन राहिला, तर कारागृहाची गर्दी वाढते आणि त्याच्या कुटुंबावरही अन्याय होतो. म्हणून राज्य सरकारने प्रथम 'कारागृह भरणे' हे यशाचे मापदंड न मानता 'गुन्हे कमी करणे आणि दोषीला निश्चित शिक्षा मिळवून देणे' हे उद्दिष्ट ठरवावे. पोलिसांनी प्रतिबंधात्मक पोलिसिंगला अधिक महत्त्व द्यावे. टोळीयुद्ध, खंडणी, अमली पदार्थ, सायबर गुन्हे, महिलांवरील अत्याचार, अल्पवयीनांविरुद्धचे गुन्हे आणि पुनरावृत्ती करणारे गुन्हेगार यांच्यावर स्वतंत्र विश्लेषणाधारित यंत्रणा उभी करावी.पोलिस ठाण्यांमध्ये गुन्हा घडल्यानंतर तपास करण्याऐवजी गुन्हा घडण्यापूर्वी त्याची शक्यता ओळखणारे पोलिसिंग विकसित झाले पाहिजे. गुन्हेगारी टोळ्यांची माहिती, शस्त्रांची हालचाल, अमली पदार्थांचे मार्ग, सायबर फसवणुकीचे नमुने आणि वारंवार गुन्हे करणाऱ्या व्यक्तींची माहिती यांचा तांत्रिक पद्धतीने अभ्यास झाला पाहिजे. तपास यंत्रणेलाही स्वतंत्र बळ देणे गरजेचे आहे. प्रत्येक गंभीर गुन्ह्यात न्यायवैद्यक तज्ज्ञ, डिजिटल पुरावे, सीसीटीव्ही, मोबाईल डेटा आणि घटनास्थळावरील वैज्ञानिक पुराव्याचा शिस्तबद्ध वापर झाला पाहिजे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी २०२५ मध्ये राज्यातील दोषसिद्धीचे प्रमाण ५३ टक्क्यांपर्यंत वाढल्याचे सांगितले होते. हे स्वागतार्ह असले तरी गंभीर गुन्ह्यांमध्ये दोषसिद्धीचे प्रमाण आणखी वाढविण्यासाठी तपासाची गुणवत्ता आणि सरकारी वकिलांशी समन्वय मजबूत करणे आवश्यक आहे. कारागृहातील गर्दी कमी करण्यासाठी मात्र वेगळा दृष्टिकोन हवा. गरीब आणि पात्र न्यायाधीन बंदींना वेळेत कायदेशीर मदत, जामीन अर्ज आणि प्रकरणांचा आढावा मिळाला पाहिजे. महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरणाच्या माहितीनुसार कोठडीत असलेली व्यक्ती मोफत कायदेशीर मदतीस पात्र ठरू शकते. केंद्राच्या सूचनांमध्येही किरकोळ गुन्ह्यांतील न्यायाधीन बंदींना वैयक्तिक जातमुचलका, कायदेशीर मदत आणि संबंधित तरतुदींनुसार सुटकेचा विचार करण्यावर भर देण्यात आला आहे.

त्याचबरोबर नव्या महाराष्ट्र कारागृह कायद्यात न्यायाधीन, दोषसिद्ध, महिला, तृतीयपंथी, उच्च-सुरक्षा आणि पुनरावृत्ती करणाऱ्या गुन्हेगारांसाठी स्वतंत्र व्यवस्था, तक्रार निवारण आणि सुटकेनंतर पुनर्वसन यांसारख्या बाबींवर भर देण्यात आला आहे. या तरतुदी कागदावर न राहता प्रत्यक्षात उतरल्या पाहिजेत. राज्य सरकारने प्रत्येक जिल्ह्यासाठी 'कारागृह गर्दी कमी करण्याचा कृती आराखडा' तयार करावा. पोलिसांनी प्रकरणांच्या तपासाची कालमर्यादा निश्चित करावी. न्यायालयांशी समन्वय वाढवावा. सरकारी वकिलांची संख्या आणि गुणवत्ता वाढवावी. न्यायाधीन बंदींच्या प्रकरणांचा नियमित आढावा घ्यावा. जुन्या आणि किरकोळ प्रकरणांना प्राधान्याने निकाली काढण्यासाठी विशेष मोहिमा राबवाव्यात. आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे गुन्हेगारी वाढली की कारागृह वाढविणे हा अंतिम उपाय असू शकत नाही. कारागृहाची क्षमता वाढवावीच लागेल; परंतु त्यापेक्षा मोठी गरज आहे ती गुन्हेगारीची कारणे शोधण्याची. बेरोजगारी, अमली पदार्थ, कौटुंबिक हिंसा, बालगुन्हेगारी, सायबर फसवणूक, संघटित गुन्हेगारी आणि सामाजिक तणाव यावर प्रतिबंधात्मक धोरण आवश्यक आहे. कायदे वाढत आहेत, गुन्हे नोंदविले जात आहेत, पोलिस तपास करत आहेत आणि कारागृह भरत आहेत; पण या साखळीचा शेवट 'न्याय' येथे झाला पाहिजे. महाराष्ट्राला उंच भिंतींची नव्हे, तर कमी गुन्हे, सक्षम तपास, जलद न्याय आणि प्रभावी पुनर्वसनाची व्यवस्था हवी आहे.सरकारने आणि पोलिसांनी या कारागृहातील गर्दीला संकट म्हणून नव्हे, तर संपूर्ण फौजदारी न्यायव्यवस्थेचा 'आरोग्य अहवाल' म्हणून पाहण्याची वेळ आता आली आहे.

# श्रावणी शनिवार निमित्ताने शनिशिंगणापुरात शनि भक्तांचा जनसागर



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**सोनई :** पवित्र श्रावण महिन्यातील तिसऱ्या शनिवारचे अवचित्य साधून आज राज्यसह देशभरातील व स्थानिक लाखो भाविकांनी श्री शेत्र शनिशिंगणापूर येथे ''शनिदेव'' दर्शन भक्तांनी लाभ घेतला. शनिवारी पहाटेपासूनच दर्शनासाठी चारही रस्त्याने भाविकांनी पायी चालत मोठी गर्दी केली होती.यावेळी मंदिर परिसरात येण्याच्या रस्त्यालगत शनी भाविकांसाठी खिचडी, केळी, चहा साबुदाणा वडा,असे उप वासाचे पदार्थाचे मोफत ठिकठिकाणी वाटप करून अन्नदानाचे महाप्रसादाचा भंडारा ही मोठ्या प्रमाणात लागले होते. श्रावण महिन्यात शनि देवाला जल अभिषेक घालण्याची परंपरा असल्याने पहाटे पाच ते सात या वेळेत हजारो शनी भक्तांनी चौथ्यावर जाऊन शनि मूर्तीचे दर्शन घेतले. देवस्थानच्या वतीने अनेक सुविधा पुरविण्यात आल्या. यावर्षी शनी भक्तांचा भांडारा अन्नदान तयार करण्यासाठी मंदिर परिसरात मज्जाव करण्यात आला मात्र अन्नदानाचे वाटप मंदिर परिसरात करण्याची परवानगी यावेळी देण्यात आली होती. मंदिरी परिसरातील गर्दी लक्षात घेता भाविकासाठी एक मोठी अन्नदानाची पर्वणीचा लाभ घेता आला.

यावेळी दोन लाखाहून अधिक श्रावण महिन्यात एकाच दिवशी भाविकांनी दर्शन घेतले. नेवासा मतदारसंघाचे महायुतीचे आमदार विठ्ठलराव लंघें, मुंबईचे आमदार प्रकाश सुर्वे सह वरिष्ठ शनिभक्तांनी हजेरी लावली. देवस्थानच्या वतीने मुख्य कार्यकारी अधिकारी अतुल चोरमारे यांनी सर्व मान्यवरांचे स्वागत करून मंदिर परिसरात स्वतः काटेकोरपणे पाहणी करून सुरक्षेतेचा आढावा घेतला.पोलीस प्रशासन व सुरक्षा कर्मचारी यांनी चोख बंदोबस्त ठेवला होता.

# वेळीच निदान, योग्य उपचारांनी हृदयविकारावर मात शक्य : डॉ. विक्रांत देशमुख



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**गंगापूर:**बदलती जीवनशैली, वाढता ताणतणाव, चुकीच्या आहाराच्या सवयी, व्यायामाचा अभाव आणि व्यसनाधीनतेमुळे हृदयविकाराचे प्रमाण वाढत आहे. आता तरुणांमध्येही हृदयविकाराचा झटका, उच्च रक्तदाब तसेच हृदयातील ब्लॉकेजच्या समस्या आढळून येत आहेत. त्यामुळे हृदयविकाराची लक्षणे जाणवताच वेळीच वैद्यकीय सल्ला घेऊन योग्य उपचार करणे आवश्यक आहे, असे मत मेडिकव्हर हॉस्पिटलचे हृदयरोग तज्ज्ञ डॉ. विक्रांत देशमुख यांनी पत्रकार परिषदेत व्यक्त केले. छातीत दुखणे किंवा दडपण जाणवणे, श्वास घेण्यास त्रास होणे, डावा हात, मान किंवा जबड्यात वेदना होणे, अधिक घाम येणे, मळमळ, अचानक थकवा किंवा चक्कर येणे ही हृदयविकाराची संभाव्य लक्षणे आहेत. अशी लक्षणे आढळल्यास उपचारात विलंब करू नये, असे डॉ. देशमुख यांनी सांगितले.हृदय निरोगी ठेवण्यासाठी संतुलित आहार, नियमित व्यायाम, चालणे आणि तणाव नियंत्रण आवश्यक आहे. धूम्रपान व मद्यपानापासून दूर राहण्याचा सल्लाही त्यांनी दिला. मधुमेह, उच्च रक्तदाब, वाढलेले कोलेस्ट्रॉल किंवा हृदयविकाराचा कौटुंबिक इतिहास असलेल्या व्यक्तींनी नियमित आरोग्य तपासणी करून घ्यावी. वेळीच निदान आणि योग्य उपचारांमुळे हृदयविकाराचा धोका कमी करता येतो, असेही डॉ. देशमुख यांनी स्पष्ट केले

# गणेशोत्सव काळात नियम पाळा अन्यथा कठोर कारवाई : पो.नि. रवींद्र देशमुख



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**राहुरी:**आगामी गणेशोत्सव काळात सर्वच डिजे चे चालक व मालक यांनी नियम अटी पाळून तसेच कायद्याच्या चौकटीत राहून गणेशोत्सव साजरा करावा. अन्यथा कठोरात कठोर कारवाई करण्यात येईल, असा सज्जड इशारा पोलिस निरीक्षक रविंद्र देशमुख यांनी दिला.

गणेशोत्सव काही दिवसांवर येऊन ठेपलाय. त्या अनुषंगाने दि. २९ ऑगस्ट २०२६ रोजी राहुरी पोलीस ठाण्यात पोलीस निरीक्षक रविंद्र देशमुख यांनी राहुरी तालुक्यातील डिजे चालक व मालकांची बैठक आयोजित केली होती. यावेळी रविंद्र देशमुख म्हणाले, लहान मुले, वयोवृद्ध किंवा इतर कोणाला त्रास होईल, अशा प्रकारे डिजे वाजवू नये. तसेच डिजेवर अश्लिल गाणे वाजवू नये. आवाजावर मर्यादा ठेवावी. कायद्यानुसार नियम व अटिंचे पालन करावे.

यावेळी डिजे असोसिएशन संघटनेचे अध्यक्ष दिपक साळवे, उपाध्यक्ष भास्कर देवकाते, कृष्णा घाडगे, संजय भोसले, बंडू शिंदे, अमोल साळवे, सनी साळवे, भगा कोबरणे, यश सरोदे, संतोष गवते, कबीर पठाण, प्रतिक गाडेकर, दिनेश गाडे, सोनू पवार, नकुल वैरागर, निखील काकडे, दादा आहेर, कुणाल अमृत, संदिप टगरे, बबलू गाडेकर, समर्थ तारडे, अनिकेत कुंभकर्ण आदि उपस्थित होते.

# राहुरी फॅक्टरीतील घरफोडीचा छडा

## एलसीबीकडून एक जेरबंद, चोरीच्या अन्य घटनांचीही कबुली

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**राहुरी :** राहुरी फॅक्टरी येथील प्रसादनगरमध्ये शाहुल जॉन वंजारे यांच्या घरात झालेल्या घरफोडीचा स्थानिक गुन्हे शाखेने छडा लावला असून, एका आरोपीला जेरबंद करण्यात आले आहे. रोहन अनिल ऊर्फ यासीनखाँ भोसले (रा. गोंडेगाव, ता. नेवासा) असे अटक केलेल्या आरोपीचे नाव आहे.दि. २५ ऑगस्ट रोजी सकाळी ही घरफोडी उघडकीस आली होती. वंजारे कुटुंबीय रात्री घरात झोपलेले असताना अज्ञात चोरट्यांनी घरात प्रवेश केला. ज्या खोलीत कुटुंबीय झोपले होते, त्या खोलीच्या दरवाजाला बाहेरून कडी लावून चोरट्यांनी शेजारील खोलीतील सामानाची उचकापाचक केली. त्यानंतर सोन्या-चांदीचे दागिने व रोख रक्कम घेऊन चोरटे पसार झाले होते. याप्रकरणी राहुरी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. अहिल्यानगर स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक संतोष मुटकुळे यांच्या मार्गदर्शनाखाली पथकाने तपास सुरू केला. तांत्रिक विश्लेषण व गोपनीय माहितीच्या आधारे आरोपी निष्पन्न करण्यात आला. त्यानंतर २८ ऑगस्ट रोजी नेवासा तालुक्यात सापळा रचून रोहन भोसले याला ताब्यात घेण्यात आले. चौकशीत त्याने अन्य साथीदारांची नावे सांगितली. तसेच पाथर्डी तालुक्यात मोटारसायकल चोरी आणि महिलेच्या गळ्यातील मंगळसूत्र चोरी केल्याची कबुली दिल्याची माहिती पोलिसांनी दिली. या प्रकरणात रोहन भोसलेसह गुलब्या शिवाजी भोसले, राजेश इंदोर भोसले आणि गुण्या ऊर्फ सलमान बिंटू काळे या चार जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून, अन्य आरोपी फरार आहेत.ही कारवाई पोलिस उपनिरीक्षक संदीप दरवडे यांच्या नेतृत्वाखाली पोलिस अंमलदार विष्णू भागवत, फुरकान शेख, प्रशांत राठोड, भाऊसाहेब काळे, किशोर शिरसाठ, आजिनाथ पाखरे, बाळासाहेब खेडकर व अरुण मोरे यांच्या पथकाने केली.

# बेपत्ता विवाहितेचा मृतदेह साकुर शिवारात आढळला

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**झरेकाठी:**एकीकडे रक्षाबंधनाचा सण उत्साहात साजरा होत असतानाच संगमनेर तालुक्यातील साकूर शिवारातून धक्कादायक घटना समोर आली. साकूर शिवारातील मांगमळई परिसरात ३५ वर्षीय विवाहित महिलेचा झाडाला गळफास घेतलेल्या अवस्थेतील मृतदेह रक्षाबंधनाच्या दिवशी सकाळी आढळून आला.

भागूबाई काशिनाथ खेमनर (वय ३५, रा. हिरेवाडी, ता. संगमनेर) असे मृत महिलेचे नाव आहे. घटनेची माहिती मिळताच घारगाव पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी लोणी येथे पाठविला.मिळालेल्या माहितीनुसार, भागूबाई खेमनर या जुन्नर तालुक्यातील आळेफाटा परिसरात मेंढ्या चारण्यासाठी कुटुंबासह वास्तव्यास होत्या. २१ ऑगस्ट रोजी डौकेनगर, आळेफाटा येथील राहत्या घरातून 'माझी भावजय आजारी असून, तिला दवाखान्यात घेऊन जायचे आहे,' असे सांगून त्या घराबाहेर पडल्या होत्या. मात्र, त्यानंतर त्या घरी परतल्या नाहीत.

भागूबाई बेपत्ता झाल्यानंतर कुटुंबीयांनी त्यांचा शोध घेतला. त्यानंतर २१ ऑगस्ट रोजी आळेफाटा पोलिस ठाण्यात मिसिंगची तक्रार दाखल करण्यात आली होती. पोलिसांकडून तसेच कुटुंबीयांकडून त्यांचा शोध सुरू असतानाच तब्बल सात दिवसांनी साकूर शिवारातील मांगमळई परिसरात त्यांचा मृतदेह झाडाला गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळला. त्यांची आत्महत्या आहे की यामागे काही घातपाताचा प्रकार आहे याचा पुढील तपास घारगाव पोलिस करीत आहेत.

# वांबोरी येथील पटारे पागिरे वस्तीवर शेळीची शिकार



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**राहुरी:**तालुक्यातील वांबोरी येथे काल गुरुवारी पहाटे पाच वाचण्याच्या सुमारास वांबोरी येथे असलेल्या पटारे -पागिरे वस्तीवरील सिताराम गोविंद पागिरे यांच्या घराजवळ असलेल्या शेडच्या आत मध्ये बिबट्याने त्या शेडची जाळी तोडून आत असलेल्या शेळीवर हल्ला केला. या हल्ल्यामध्ये शेळीला जागेवरच ठार केली आहे. पहाटेच्या सुमारास हा प्रकार उघडकीस आला. त्यानंतर घटनेची माहिती पागिरे यांनी वनविभागाच्या अधिकाऱ्यांना कळविताच वनविभागाचे अधिकारी अडांगळे यांनी घटनास्थळी येऊन तात्काळ पंचनामा केला.यामध्ये साधारणत: पागिरे यांचे सुमारे पंधरा हजार रुपयांचे आर्थिक नुकसान झालेले आहे. सध्या पिकांची वाढ झाली असल्यामुळे बिबट्या गिनी गवत व इतर ठिकाणी दबा धरून बसलेला असतो. त्यामुळे नागरिकांमध्ये दहशत निर्माण झालेली आहे. काल राहुरी तालुक्यात मांजरी येथील मुलगा व त्याचे वडील या दोघांवरही बिबट्याने हल्ला करून त्यांना जखमी केल्याचाही प्रकार घडला. त्यामुळे वनविभागाने तातडीने पावले उचलून पिंजरा लावण्याची मागणी नागरिक करीत आहेत.

# योगीराज भक्त प्रल्हादगिरी महाराज पुण्यतिथी सोहळ्याची पालखी मिरवणुकीने सांगता



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**नेवासा:**हंडीनिमगाव-सुरेशनगरच्या मध्यावर असलेल्या श्री क्षेत्र त्रिवेणीश्वर महादेव देवस्थान येथे अजानबाहू योगीराज भक्त प्रल्हादगिरी महाराज यांच्या २८ व्या पुण्यतिथी सोहळ्याची भागवताचार्य हभप समाधान महाराज शर्मा यांच्या कीर्तनाने व पालखी मिरवणुकीने भक्तिमय वातावरणात सांगता झाली. पुण्यतिथीच्या मुख्य दिवशी पहाटे वेदमंत्रांच्या जयघोषात त्रिवेणीश्वर शिवलिंगासह योगीराज भक्त प्रल्हादगिरी महाराज यांच्या समाधीस महंत रमेशानंदगिरी महाराज यांच्या हस्ते जलाभिषेक करण्यात आला. त्यानंतर हभप समाधान महाराज शर्मा यांनी कीर्तनातून प्रल्हादगिरी महाराजांचे जीवनकार्य व संत महिमा विशद केला.यावेळी सजविलेल्या रथात महाराजांची प्रतिमा व पादुका दर्शनासाठी ठेवण्यात आल्या होत्या. महंत रमेशानंदगिरी महाराज यांनी भजने म्हणत पालखीचे पूजन करून मिरवणुकीचे नेतृत्व केले. विविध मान्यवर व सेवेकऱ्यांनी पादुकांचे पूजन केले.मंदिर प्रदक्षिणेनंतर मिरवणुकीचा समारोप झाला. महिला भाविकांनी टाळ-मृदुंगाच्या गजरात 'राधेकृष्ण, गोपाल कृष्ण'चा जयघोष करत फुगडी खेळली. भाविकांना श्रीफळ-प्रसाद व महाप्रसादाचे वाटप करण्यात आले.

# लेकुरवाळी आखाडा येथे अखंड हरिनाम सप्ताहास ध्वजारोहण करून प्रारंभ



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**नेवासाः** तालुक्यातील लेकुरवाळी आखाडा येथे अखंड हरिनाम सप्ताह निमित्ताने श्री ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळयास शनिवार दि.२९ ऑगस्ट पासून धर्म ध्वज पूजन करून ध्वजारोहणाने भक्तिमय वातावरणात प्रारंभ करण्यात आला.या शुभारंभ सोहळयाचे मार्गदर्शक ह.भ.प. बापू महाराज गारुळे बेलपांढरीकर यांच्या हस्ते धर्म ध्वज पूजन करून ध्वजारोहणाने करण्यात आले. सदर सोहळा दि.५ सप्टेंबर पर्यंत चालणार आहे झालेल्या ध्वजारोहण प्रसंगी सप्ताह कमिटीचे शंकर शेंडगे,पोपट शेंडगे,बाबासाहेब कोळेकर, बापुसाहेब शेंडगे,गंगाधर दगडू शेंडगे. व गावातील ,गणेश शेंडगे, गोरक्षनाथ शेंडगे,सरपंच संतोष शेंडगे, भागेश्र्वर शेंडगे, विठ्ठल शेंडगे,सचिन शेंडगे,सुधाकर कोळेकर,जगन्नाथ शेंडगे,भाऊसाहेब शेंडगे,चंद्रकांत येळे,विष्णू उदमले,शेंडगे सर,जितेंद्र कोळेकर, नानासाहेब मदने,चेअरमन राहुल जायगुडे,गणेश शेंडगे यांच्यासह भाविक उपस्थित होते.

अखंड हरिनाम सप्ताहात पहाटे ५ ते ६ काकडा आरती भजन, सकाळी ७ ते ११ श्री ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सायंकाळी ५ ते ६ हरिपाठ, ७ ते ९ किर्तन व तद्नंतर महाप्रसाद असे दैनंदिन कार्यक्रम होणार आहे. दि.५ सप्टेंबर रोजी सकाळी ९ ते ११ यावेळेत गोंधवणी येथील ज्ञानाई गुरूकुलचे मठाधिपती ह.भ.प. ऋषिकेशजी महाराज वाकचौरे यांच्या काल्याचे किर्तनाने अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता होणार आहे.

# औरंगपूरमध्ये पद्मश्री विखे पाटील यांची जयंती 'शेतकरी दिन' म्हणून साजरी

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**प्रवरानगर:**संगमनेर तालुक्यातील औरंगपूर ग्रामपंचायत कार्यालयात देशातील पहिले सहकारमहर्षी पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील यांची १२६ वी जयंती 'शेतकरी दिन' म्हणून साजरी करण्यात आली. यावेळी पद्मश्री विखे पाटील यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी सामाजिक कार्यकर्ते तथा जनसेवा मंडळाचे अध्यक्ष विजयराव डेंगळे यांनी पद्मश्रींच्या कार्याला उजाळा दिला. प्रवरा परिसरातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांना एकत्रित करून १९५० मध्ये प्रवरा नगर येथे आशिया खंडातील पहिला सहकारी साखर कारखाना उभारण्याचा ऐतिहासिक निर्णय त्यांनी घेतला. हा केवळ साखर कारखाना उभारण्याचा उपक्रम नव्हता, तर ग्रामीण भागातील शेतकरी स्वतःच्या मालकीची सहकारी संस्था उभारून उद्योग चालवू शकतो, हा विश्वास त्यांनी निर्माण केला, असे डेंगळे यांनी सांगितले.

पद्मश्री विखे पाटील यांनी गोरगरीब शेतकरी व सर्वसामान्यांसाठी दवाखाने आणि शाळा सुरू करून सामाजिक बांधिलकी जपली. त्यांच्या सहकार विचारांचा वारसा पुढील पिढीपर्यंत पोहोचविणे हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल, असेही डेंगळे म्हणाले.

कार्यक्रमास सरपंच लक्ष्मीबाई वाकचौरे, उपसरपंच मीनाक्षी वदक, माजी उपसरपंच इंद्रभान तांबे, ज्ञानेश्वर तांबे, भाऊसाहेब तळोले, कृषी सहाय्यक पाटील, ग्रामविकास अधिकारी गागरे यांच्यासह शेतकरी, महिला व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# वृक्षांना राखी बांधत मालदाडमध्ये अनोखे रक्षाबंधन

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**संगमनेर:** रक्षाबंधन म्हणजे प्रेम, आपुलकी आणि रक्षणाच्या भावनेचे प्रतीक. याच भावनेला निसर्ग संवर्धनाची जोड देत संगमनेर तालुक्यातील डोंगरदऱ्या व निसर्गसौंदर्याने नटलेल्या मालदाड गावात महिलांनी वृक्षांना राखी बांधून अनोख्या पद्धतीने रक्षाबंधन साजरे केले.

मालदाड येथील चैतन्य श्री कानिफनाथ महाराज देवस्थान इनाम परिसरात हा उपक्रम राबविण्यात आला. महिलांनी विविध झाडांना राख्या बांधून त्यांचे संरक्षण व संवर्धन करण्याचा संदेश दिला. वृक्ष हे खऱ्या अर्थाने निस्वार्थी मित्र असून ते सावली, फळे, फुले तसेच जीवनावश्यक प्राणवायू देतात. त्यामुळे वसुंधरेचे संरक्षण करणे ही प्रत्येकाची नैतिक जबाबदारी असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

लोकनेते बाळासाहेब थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली मालदाड गावात विविध विकासकामांसह मोठ्या प्रमाणावर वृक्षलागवड करण्यात आली आहे. त्यामुळे गाव हिरवाईने नटले आहे. वृक्षांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी महिलांनी हा उपक्रम राबविला.

यावेळी सरपंच गोरक्षनाथ नवले, लता सोनवणे, अलका पराड, अप्सरा गिरी, अनिता नवले, स्वाती नवले, अर्चना नवले, मंगल गफले, सुनीता नवले, शारदा शेलार, संगिता नवले यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते.

हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक काकासाहेब बाबासाहेब नवले** यांनी त्यांच्या साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड करिता, प्लॉट नं. २० ए, इंदिरानगर, शिरसगाव, श्रीरामपुर, जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र) ४१३ ७०९ इंडिया येथे छापून साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड, दै. राष्ट्र सह्याद्री कार्यालय, मिनी स्टेडियम कॉम्प्लेक्स, पहिला मजला, नवीन कोर्टाशेजारी, श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर, पिन नं. ४१३७०९, जिल्हा कार्यालय -कोहिनूर प्लाझा, दूसरा मजला, पत्रकार चौक, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर, महाराष्ट्र, इंडिया येथे प्रकाशित केले, संपादक : करण बाबासाहेब नवले RNI No. MAHMAR/2019/82605 www.rashtrasahyadri.com
owner "publisher & Printer **Kakasaheb Babasaheb Nawale** To be Printed At Saved Prakashan Private Limited 2d, plot n. 20 A, Indiranagar, Shirasgaon, Shrirampur, Dist. Ahilyanagar, 413709 (Maharashtra) India & published At Saived Prakashan Private Limited Daily Rashtra Sahyadri Office, Mini Stedium Complex, First Floor. Near New Court, Shrirampur. Dist. Ahilyanagar, Maharashtra 413 709, India Editor: **Karan Babasaheb Nawale**" RNI No MAHMAR/2014/82605 www.rashtrasahyadri.com, EmalID- rashtrasahyadri@gmail.com. Mo. 7774001818 (पोस्टल परवाना No:G-2/Rashtra Shyadri / RNP/2025-26 )

दखल

## राहुरी तालुक्याची सून तनुजा विधाते हिचे नेट परीक्षेत उज्वल यश



**राहुरी** : तालुक्यातील ताहराबाद येथील तनुजा जितेंद्र विधाते यांनी नेट परीक्षेत उज्वल यश संपादन केले असून रामदास पाटील धुमाळ कॉलेज राहुरी येथून शिक्षण पूर्ण केले असून एम ए हिंदी विषयातून पुणे विद्यापीठ सावित्रीबाई फुले येथून शिक्षण पूर्ण केले आहे. दिल्ली येथील विश्वविद्यालय अनुदान आयोगातर्फे नुकत्याच झालेल्या नेट परीक्षेच्या निकालात तनुजा विधाते यांना ९१.६६ टक्के इतके गुण मिळाले असून या परीक्षेत व सेट परीक्षेत देखील चांगले गुण मिळवून यश संपादन केले आहे. त्यांच्या या यशाबद्दल त्यांचे सासरे माधव विधाते, पती जितेंद्र विधाते, आर पी आय अध्यक्ष विलास साळवे, वंचितचे अध्यक्ष पिंटू साळवे, पत्रकार राजेंद्र परदेशी, आप्पा मकासरे, राजू पवार महेश कासार यांनी अभिनंदन केले आहे.

## बाभळेश्वरला बुधवारपासून आधुनिक दुग्ध व्यवसाय प्रशिक्षण

**लोणी** : पायरेन्सच्या कृषी विज्ञान केंद्र, बाभळेश्वर येथे ग्रामीण युवक-युवतींसाठी आधुनिक दुग्ध व्यवसाय विषयावरील दोन दिवसीय प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले आहे. बुधवार दि. २ सप्टेंबरपासून प्रशिक्षणाला सुरुवात होणार असून, केंद्राचे प्रमुख शास्त्रज्ञ शैलेश देशमुख यांनी ही माहिती दिली. कृषीपूरक व्यवसायाच्या माध्यमातून ग्रामीण भागातील युवक-युवतींना रोजगार व उद्योजकतेच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी कृषी विज्ञान केंद्राच्या माध्यमातून कृषी उद्योजकता अभियान राबविण्यात येत आहे. प्रशिक्षणात मुक्त संचार पद्धतीने गोठा व्यवस्थापन, रोग व आजार व्यवस्थापन, लसीकरण, प्रकल्प आराखडा, मार्केटिंग, शेड उभारणी, बँकिंग योजना तसेच दुग्धजन्य पदार्थ निर्मिती याबाबत तज्ज्ञ मार्गदर्शन करणार आहेत. प्रशिक्षणार्थींना प्रक्षेत्र भेटीही दिल्या जाणार असून, एकूण ३० प्रशिक्षणार्थींची क्षमता आहे.

## उंबरी बाळापूरमध्ये भरदिवसा घरफोडी



**आश्वी** : घर बंद असल्याची संधी साधून अज्ञात चोरट्यांनी कुलूप तोडून घरातील रोख रक्कम व चांदीचे पैंजण चोरून नेल्याची घटना उंबरी बाळापूर (ता. संगमनेर) शिवारात शनिवारी घडली. भरदिवसा झालेल्या या चोरीमुळे परिसरात खळबळ उडाली असून, नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. शीला भाऊसाहेब वर्पे (वय ६०) या उंबरी बाळापूर येथे एकट्या राहतात. त्यांचा मुलगा नोकरीनिमित्त पुणे येथे असतो. शनिवारी सकाळी १०.१५ वाजता त्या घराला कुलूप लावून वैयक्तिक कामासाठी संगमनेर येथे नातेवाईकांकडे गेल्या होत्या. याच संधीचा फायदा घेत चोरट्यांनी घराचे कुलूप तोडून प्रवेश केला. दुपारी १२.३० वाजता शेजारी राहणारे सुभाष भुसाळ यांनी वर्पे यांना फोन करून घराचा दरवाजा उघडा असल्याची माहिती दिली. वर्पे यांनी घरी येऊन पाहिले असता दोन्ही दरवाजांची कुलपे तुटलेली होती. घरातून दोन हजार रुपयांची रोकड व चांदीचे पैंजण चोरीस गेले. याप्रकरणी वर्पे यांनी आश्वी पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली असून, अज्ञात चोरट्यांचा शोध सुरू आहे.

# चासनळीत कचरा टाकणाऱ्यांना 'पुणेरी' स्टाईल इशारा

### जनसेवा फाउंडेशनच्या मिश्कील इशाऱ्यात स्वच्छतेचा जागर

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री




**कोळपेवाडी** : पुणेरी पाट्या म्हटल्या की टोमणे, उपरोध आणि मिश्कील भाषेतून दिलेले मार्मिक संदेश डोळ्यांसमोर येतात. साध्या शब्दांत मोठा आशय सांगण्याची पुणेरी पाट्यांची हीच खासियत आहे. त्यामुळे रस्त्याने जाताना एखादी पुणेरी पाटी दिसली की ती वाचल्याशिवाय पुढे जाणे अनेकांना जमत नाही. असाच काहीसा अनुभव सध्या कोपरगाव तालुक्यातील चासनळी परिसरातील नागरिकांना येत असून, जनसेवा फाउंडेशनने लावलेल्या एका भन्नाट बोर्डमुळे चासनळीसह पंचक्रोशीतील नागरिकांना पुणेरी पाट्यांची आठवण झाली आहे. चासनळी येथील मंजूर रोडवरील तिडके पाटील विद्यालयाच्या पाठीमागील परिसरात वर्षानुवर्षे साचणाऱ्या कचऱ्याच्या समस्येवर जनसेवा फाउंडेशनच्या वतीने अनोख्या पद्धतीने जनजागृती करण्यात आली.

ही शाळा आहे... कचरा डेपो नाही! असा स्पष्ट संदेश देणाऱ्या फलकावर पुढे या ठिकाणी कचरा टाकणाऱ्याची बायको पळून जाईल! असा मिश्कील इशारा देण्यात आला आहे. त्यामुळे हा बोर्ड सध्या नागरिकांच्या कुतूहलाचा आणि चर्चेचा विषय ठरला आहे. पुणेरी पाट्यांमध्ये ज्या पद्धतीने थोड्या मिश्कील, उपरोधिक आणि खुमासदार भाषेत एखादा गंभीर संदेश दिला जातो, अगदी त्याच धर्तीवर जनसेवा फाउंडेशनने हा फलक तयार केला आहे. फलक वाचून हसू येत असले तरी त्यामागचा संदेश मात्र गंभीर आहे, कचरा टाकू नका आणि परिसर स्वच्छ ठेवा! नेहमीच्या कचरा टाकू नये, स्वच्छता राखावी अशा सूचना दुर्लक्षित करणाऱ्यांचे लक्ष वेधण्यासाठी फाउंडेशनने या हटके पद्धतीचा आधार घेतला आहे.

चासनळीवरून मंजूर येथील श्री सिद्धेश्वर देवस्थानाकडे जाणारा प्रमुख मार्ग, तसेच रोहमारे ज्युनिअर कॉलेज, सेंट मदर टेरेसा इंग्लिश मीडियम स्कूल, फार्मर्स डेन इंग्लिश मीडियम स्कूल आणि तिडके पाटील विद्यालय याच मार्गावर आहेत. त्यामुळे या परिसरात साचणाऱ्या कचऱ्याचा विद्यार्थी, शिक्षक आणि नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत होता. दुर्गंधी आणि अस्वच्छतेमुळे परिसरातील नागरिक त्रस्त होते, तर विद्यार्थ्यांच्या आरोग्याच्याही दृष्टीने ही बाब चिंताजनक होती. वारंवार आवाहन करूनही कचरा टाकण्याचे प्रमाण कमी होत नसल्याने जनसेवा फाउंडेशनने स्वतः पुढाकार घेतला.

या स्वच्छता मोहिमेत रामेश्वर थोरात, ज्ञानेश्वर धेनक, शैलेश गाडे, नवनाथ उल्हारे, लक्ष्मण तिडके, अमीन पठाण, सुखदेव माळी, भागिनाथ धेनक, बापू कुईटे, विनोद सावंत, अनिल धेनक, संतोष काशीद सर, अमोल पेटारे सर, निलेश ब्राह्मणे, भैय्या माळी, विनायक माळी, नाना धेनक, चंद्रकांत सोनवणे, रंजीत चांदगुडे. ऋषिकेश चांदगुडे नितीन गाडे भाऊसाहेब माळी यांच्यासह फाउंडेशनच्या सदस्यांनी सहभाग घेतला. जनसेवा फाउंडेशन चासनळीचे अध्यक्ष पवनकुमार चांदगुडे यांच्या पुढाकाराने फाउंडेशनच्या सदस्यांनी परिसरात श्रमदान करून तब्बल दोन ट्रॉल्या कचरा जमा केला आणि परिसराची स्वच्छता केली. त्यामुळे केवळ बोर्ड लावून जनजागृती करण्याऐवजी प्रत्यक्ष कृतीतूनही स्वच्छतेचा संदेश देण्यात आला. विशेष म्हणजे, परिसर स्वच्छ केल्यानंतर पुन्हा तेथे कचरा जमा होऊ नये यासाठी फाउंडेशनने हे मिश्कील फलक लावले आहेत.

ही शाळा आहे... कचरा डेपो नाही! आणि या ठिकाणी कचरा टाकणाऱ्याची बायको पळून जाईल! अशा खुमासदार मजकुरामुळे या फलकांनी नागरिकांचे लक्ष वेधले आहे. त्यामुळे रस्त्याने जाणारे नागरिक थांबून बोर्ड वाचत असून, त्यावर चर्चा आणि मिश्कील प्रतिक्रिया देताना दिसत आहेत. मात्र या मिश्कीलतेमागे फाउंडेशनचा उद्देश स्पष्ट आहे,हसता हसता नागरिकांच्या मनात स्वच्छतेची सवय रुजविणे.

बोर्डवर भन्नाट इशारा आणि प्रत्यक्ष हातात झाडू अशी या उपक्रमाची आगळीवेगळी सांगड घालत जनसेवा फाउंडेशनने स्वच्छतेसाठी एक वेगळा प्रयोग केला आहे. त्यामुळे हा उपक्रम सध्या चासनळी पंचक्रोशीत पुणेरी पाटीच्या धर्तीवरचा चासनळीचा भन्नाट फलक म्हणून चर्चेचा विषय ठरला आहे.

## समनापूरच्या विकासासाठी दीड वर्षांत दीड कोटींचा निधी : आ. अमोल खताळ

### बाळूमामा मंदिर कमानीचे आमदार खताळ यांच्या हस्ते लोकार्पण



प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**संगमनेर** : संगमनेर तालुक्यातील समनापूर येथे बाळूमामा मंदिर कमानीचा लोकार्पण सोहळा आमदार अमोल खताळ यांच्या हस्ते उत्साहात पार पडला. यावेळी बोलताना आ. खताळ यांनी, आमदारकीच्या दीड वर्षांच्या कार्यकाळात समनापूर गावासाठी सुमारे दीड कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून दिल्याचे सांगितले. बाळूमामा यांच्या नावाने कमान उभारण्याची भक्तमंडळाची इच्छा होती. ही कमान आपल्या हातून पूर्ण व्हावी, अशी बाळूमामांची इच्छा होती.

त्यामुळे कोणत्याही निधीची प्रतीक्षा न करता स्वखर्चातून कमानीचे काम पूर्ण केल्याचे आ. खताळ यांनी सांगितले. गेल्या चाळीस वर्षांत कोणी काय केले, याची चर्चा न करता तालुक्यातील प्रलंबित विकासकामे पूर्ण करण्यावर आपला भर असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या माध्यमातूनही विविध विकासकामे मार्गी लागत आहेत. खासदार भाऊसाहेब वाकचौरे यांच्या माध्यमातून मतदारसंघातील विकासकामांना अधिक निधी मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे, असेही त्यांनी नमूद केले.

### आरोग्य, शिक्षण, रोजगाराला प्राधान्य

संगमनेर तालुक्यातील आरोग्याचा प्रश्न सोडविण्यासाठी विशेष प्रयत्न सुरू असून, कौठे मलकापूर येथे एमआयडीसी उभारणीचे काम सुरू आहे. जिल्हा परिषदेच्या शाळांच्या दुरुस्तीसाठीही आगामी काळात विशेष उपक्रम हाती घेणार असल्याचे आ. खताळ यांनी सांगितले. कार्यक्रमास ग्रामस्थ व भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## गौतम पब्लिक स्कूलमध्ये राष्ट्रीय क्रीडा दिन उत्साहात

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री



**कोळपेवाडी** : हॉकीचे जादूगार मेजर ध्यानचंद यांच्या जयंतीनिमित्त गौतम पब्लिक स्कूलमध्ये राष्ट्रीय क्रीडा दिन विविध क्रीडा उपक्रमांनी उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी विद्यार्थ्यांनी इंटर हाऊस हॉकी सामन्यांसह विविध क्रीडा स्पर्धांमध्ये उत्स्फूर्त सहभाग घेतला. कार्यक्रमाच्या प्रारंभी संस्थेचे चेअरमन तथा माजी आमदार अशोकराव काळे, सचिव चैतालीताई काळे यांच्यासह मान्यवरांनी मेजर ध्यानचंद यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून अभिवादन केले. प्राचार्य नूर शेख यांच्या मार्गदर्शनाखाली क्रीडा विभागप्रमुख रमेश पटारे, राजेंद्र आढाव, इसाक सय्यद व महेश गोंडे यांच्या नियोजनातून हॉकी सामन्यांचे आयोजन करण्यात आले.

ऑरेंज, ब्ल्यू, ग्रीन आणि यलो हाऊसच्या खेळाडूंनी कौशल्यपूर्ण खेळाचे प्रदर्शन करत मैदानावर चुरस निर्माण केली. सामन्यांचे उद्घाटन मीरा-भाईंदर नवघर डिव्हिजनचे एसीपी सोहेल शेख यांच्या हस्ते झाले. खेळामुळे आत्मविश्वास, नेतृत्वगुण, शिस्त व संघभावना विकसित होते, असे त्यांनी सांगितले. विविध स्पर्धांतील विजेत्या विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात आला. कार्यक्रमासाठी शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व हाऊस मास्टर्स यांनी परिश्रम घेतले.

## बानूमातेच्या विवाह सोहळ्याला म्हाळसादेवीच्या माहेरातून साडी चोळीचा आहेर

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री



**नेवासा** : मनमाड-मालेगावच्या मध्यावर असलेल्या बानूमातेचे माहेर असलेल्या चंदनपुरीला आयोजित विवाह सोहळयाला खंडोबादेवाची सासुरवाडी व म्हाळसादेवीचे माहेर असलेल्या नेवासा बुद्रुक येथून पुरातन म्हाळसा खंडोबा बानाई देवस्थानच्या वतीने हळदीसह साडी चोळीचा आहेर अर्पण करण्यात आला. खंजिरी व तुणतुण्याच्या गजरात हा सोहळा चंदनपुरी येथे भक्तिमय वातावरणात पार पडला. यावेळी चंदनपुरी येथील मुख्य खंडोबा मंदिरात सदरचा आहेर अर्पण करतेवेळी खंडोबा मंदिरातील मुख्य पुजारी तुकाराम सूर्यवंशी व विशाल सूर्यवंशी यांनी वेदमंत्राचा जयघोष केला.यावेळी नेवासा बुद्रुक येथील पुरातन म्हाळसा खंडोबा बाणाई देवस्थान जीर्णोद्धार समितीचे अध्यक्ष संभाजी ठाणगे,राजेंद्र काशीद,पत्रकार सुधीर चव्हाण, बालू फसले यांच्या हस्ते खंडोबाच्या मुख्य मूर्तीसह म्हाळसादेवी व बानूमातेला चंदनउटी व हळद लावून अभिषेक घालण्यात आला. यावेळी मुख्य पुजारी व जेजुरी पालखीचे मुख्य मानकरी बाबुराव पाटील आपसुंदे, नाशिक येथील खंडोबा भक्त उद्योजक राऊत,प्रकाश माळोदे यांच्यासह भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.भाविकांच्या उपस्थितीत आरती व तळीभांडार करण्यात आला.म्हाळसा माहेरातील सेवेकऱ्यांचा पुजारी बाबुराव पाटील आपसुंदे,तुकाराम सूर्यवंशी व विशाल सूर्यवंशी यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. यावेळी जुना वाड्यातील बाणाई मातेच्या मंदिरात ही विवाह सोहळा साजरा करण्यात आला तेथे ही संभाजी ठाणगे, राजेंद्र काशीद व बालू फसले यांच्या हस्ते साडी चोळी व धोतरपान अर्पण करण्यात आले. खंडोबा देवाच्या सासुरवाडी नेवासा येथून आलेल्या भक्त मंडळाचा यावेळी देवस्थानच्या वतीने सन्मान करण्यात आला.

# नगर-शिर्डी महामार्ग दुरुस्तीसाठी अर्धनग्न आंदोलनाला राहुरीकरांचा उत्स्फूर्त पाठिंबा

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री



**राहुरी** : गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित आणि दुरवस्थेत असलेल्या नगर-शिर्डी महामार्गाच्या तातडीने दुरुस्तीसाठी कोपरगाव येथील सामाजिक कार्यकर्ते संजय काळे यांनी पुकारलेल्या अर्धनग्न पायी आंदोलनाला राहुरी शहर व परिसरातून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला आहे. शनिवारी (दि. २९ ऑगस्ट) हे आंदोलन राहुरी शहरात पोहोचले असता, स्थानिक नागरिक, व्यापारी व रस्ता दुरुस्त कृती समितीच्या सदस्यांनी आंदोलनात सक्रिय सहभाग नोंदवत काळे यांच्या भूमिकेला जोरदार पाठिंबा दर्शविला आहे.

सामाजिक कार्यकर्ते संजय काळे यांनी २५ ऑगस्ट २०२६ रोजी शिर्डी ते अहिल्यानगर असा अर्धनग्न पायी प्रवास करत या आंदोलनाला सुरुवात केली आहे. नगर-शिर्डी रस्त्यासाठी आजवर शेकडो कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला; मात्र अधिकारी आणि ठेकेदारांच्या संगनमतामुळे कामाचा दर्जा अत्यंत निकृष्ट राहिला आहे. या महामार्गासाठी शेकडो वर्षे जुनी झाडे तोडण्यात आली, पण पुन्हा नवीन झाडे लावली गेली नाहीत आणि रस्ताही नीट झाला नाही. शासनाच्या या कारभारामुळे नागरिक अक्षरशः नागवले गेले आहेत; म्हणूनच आम्ही अर्धनग्न होऊन शासनाचा निषेध नोंदवत आहोत, असा थेट इशारा या वेळी काळे यांनी दिला.

शनिवारी हे आंदोलन राहुरी शहरात दाखल झाल्यानंतर रस्ता दुरुस्त कृती समितीचे सदस्य, व्यापारी आणि नागरिकांनी काळे यांचे स्वागत करून आंदोलनाला पाठिंबा दिला. महामार्गाच्या दुरवस्थेमुळे दैनंदिन अपघातांची संख्या वाढली असून प्रवाशांचे आणि सर्वसामान्य नागरिकांचे हाल होत असल्याने लवकरात लवकर दर्जेदार काम पूर्ण करावे, अशी मागणी या वेळी करण्यात आली. या प्रसंगी रस्ता दुरुस्त कृती समितीचे देवेंद्र लांबे, संजय देशपांडे, सुनील विश्वासराव, नवनीत दरक, ओंकार दरक सतीश घुले, संदीप गाडे, ॲड. देवेंद्र गाडे, ॲड. अमोल शेळके, ॲड. अमोल डौले, ॲड.सुहास तोडमल , डॉ. श्रीकांत कुलकर्णी, डॉ. शुभा कुलकर्णी, इंजि. अनंत शेळके, व्यापारी असोसिएशनचे अध्यक्ष प्रकाश पारख, अशोक कदम, संतोष भुजाडी, जनार्दन म्हसे, सागर राठी, प्रितेश तनपुरे, अविनाश शिंदे यांच्यासह परिसरातील नागरिक व व्यापारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### नगर-शिर्डी रस्त्यावरील खड्ड्यांना पुष्पहार अर्पण करून 'गांधीगिरी'

खड्ड्यांची झाली आरती ! राहुरीत आंदोलन दाखल झाल्यानंतर सामाजिक कार्यकर्ते संजय काळे यांच्या हस्ते नगर-शिर्डी महामार्गावरील भव्य खड्ड्यांना पुष्पहार घालून अनोख्या पद्धतीने 'गांधीगिरी' आंदोलन करण्यात आले. प्रशासनाला आणि ठेकेदाराला जाग आणण्यासाठी खड्ड्यांना हार घालताना उपस्थितांनी जोरदार घोषणाबाजी केली. शासकीय अधिकारी आणि ठेकेदारांच्या निष्काळजीपणामुळे आज रस्त्याची ही भयानक अवस्था झाली आहे, त्यामुळे या खड्ड्यांचाच सत्कार करण्याची वेळ नागरिकांवर आली आहे, असा टोला या वेळी रस्ता दुरुस्त कृती समितीचे देवेंद्र लांबे यांनी लगावला. या अनोख्या आंदोलनाने उपस्थितांचे व प्रवाशांचे विशेष लक्ष वेधून घेतले.

## संगमनेर महाविद्यालयाला 'अधिकारप्रदत्त स्वायत्त' दर्जा




प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**संगमनेर** : शैक्षणिक गुणवत्ता, उत्कृष्ट पायाभूत सुविधा, संशोधन, नवोपक्रम आणि विद्यार्थी केंद्रित उपक्रमांच्या जोरावर उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या शिक्षण प्रसारक संस्थेच्या संगमनेर नगरपालिका कला, दा. ज. मालपाणी वाणिज्य व व. ना. सारडा विज्ञान महाविद्यालयाला सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने 'अधिकारप्रदत्त स्वायत्त महाविद्यालय' हा दर्जा बहाल केला आहे. संस्थेचे कार्याध्यक्ष डॉ. संजय मालपाणी यांनी पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. सन २०२६-२७ ते २०३५-३६ या दहा वर्षांसाठी ही मान्यता देण्यात आली आहे. महाविद्यालयाला यापूर्वी नॅककडून -+ (३.५८) ग्रेड मिळाली असून, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा 'उत्कृष्ट महाविद्यालय पुरस्कार' तीन वेळा प्राप्त झाला आहे. १५ जुलै २०२० रोजी महाविद्यालयाला स्वायत्ततेचा दर्जा मिळाला होता. अधिकारप्रदत्त स्वायत्ततेमुळे विद्यापीठ अनुदान आयोग, राज्य शासन व विद्यापीठाच्या नियमांच्या चौकटीत अभ्यासक्रमांमध्ये अधिक लवचिकता मिळणार आहे. नवीन प्रमाणपत्र, डिप्लोमा, पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरू करण्याबरोबरच कौशल्याधारित व रोजगाराभिमुख अभ्यासक्रम विकसित करता येणार आहेत. मूल्यमापन पद्धतीत सुधारणा, संशोधन व नवोपक्रमाला चालना देण्यासही मदत होणार आहे.

एनइपी २०२० च्या प्रभावी अंमलबजावणीसाठी बहुविषयक शिक्षण, कौशल्यविकास व अनुभवाधारित अध्ययनाला गती मिळणार आहे. डेअरी प्रॉडक्ट्स अँड प्रोसेसिंग, ॲग्रीकल्चर अँड सॉईल सायन्स, सॉफ्टवेअर डेव्हलपमेंट, हॉस्पिटॅलिटी अँड टुरिझम तसेच अकाउंटिंग अँड टॅक्सेशनसारखे अभ्यासक्रम सुरू आहेत. ही केवळ पदवीची नव्हे, तर भविष्य घडविण्याची स्वायत्तता आहे, असे डॉ. संजय मालपाणी यांनी सांगितले.

निशाणी नं.५
दिनांक १२/०८/२०२६
नेमलेली तारीख २४/०९/२०२६

### जाहिर नोटीस

ॲड.एस.एस.कोतकर,
नेवासा कोर्ट

नेवासा येथील मे.सिव्हिल जज्ज साहेब सि.डी.यांचे कोर्टात
रे.मु.नं. ४६९/२०२६

**वादी-**१. हिराबाई उत्तम मते, वय ६०, धंदा शेती.
२. बद्रीनाथ उत्तम मते, वय ४५, धंदा शेती
३. नवनाथ उत्तम मते, यय ४३, धंदा शेती
सर्व रा. माळेवाडी, ता. नेवासा, जि. अहिल्यानगर

**प्रतिवादी-**१) महाराष्ट्र शासन (करीता सदरची बजावणी जिल्हाधिकारी साहेब अहिल्यानगर यांचेवर करण्यात यावी)
२) मा. मंडळ अधिकारी साहेब, घोडेगाव, ता. नेवासा, जि. अहिल्यानगर
३) मा. कामगार तलाठी साहेब, माळेवाडी खालसा / प्रवरासंगम, ता. नेवासा, जि. अहिल्यानगर
४) उत्तम भानुदास मते (परागंदा) रा. माळेवाडी खालसा, ता. नेवासा, जि. अहिल्यानगर

वादी यांनी सदरचा दावा दिवाणी मृत्यु ठरवुन मिळण्यासाठी दाखल केलेला आहे. वादी नं.१ ही प्र. वादी नं.३ ची पत्नी असून वादी नं.२ व ३ हे वादी नं.१ व प्र. वादी नं.३ मुले आहेत. वादी नं.१ ते ३ हे मौजे माळेवाडी खालसा, ता. नेवासा येथील रहिवासी आहे. दावा मिळकत ही वादी यांची एकत्र कुटुंबाची वडिलोपार्जित मिळकत आहे. प्र.वादी नं.३ उत्तम भानुदास मते हा वादींसमवेत मौजे माळेवाडी खालसा, ता. नेवासा येथील रहिवासी होता. प्र. वादी नं.३ यास दारुचे व्यसन होते व तो दि.०८/०९/२०१६ रोजी सकाळी ०७ वा. चे सुमारास देवगड रोडवरुन निघून गेलेला आहे. परंतू तो अद्यापपावेतो परत आलेला नाही, म्हणून वादी व त्याचे नातेवाईकांनी त्याचा शोध गावात, नेवासा व नातलगाकडे व इतर ठिकाणी घेतला. तसेच चौकशी करुनही प्र. वादी नं.३ उत्तम भानुदास मते याचा काही ठावठिकाणा लागला नाही अगर तो अद्यापपावेतो कुणासही कुठेही दिसलेला नाही. त्याबाबत त्याचे वडिल वादी नं.२ बद्रीनाथ उत्तम मते यांनी दि. २७/०९/२०१६ रोजी नेवासा पोलिस स्टेशन येथे प्र. वादी नं.३ उत्तम भानुदास मते हा बेपत्ता झाल्याची तक्रार दिली व त्यानूसार नेवासा पोलीस स्टेशनला मिसींग रजिस्टर नं.३९/२०१६ अन्वये नोंद झालेली आहे. सदर मिसींग रजिस्टरची प्रत दाव्यात दाखल केलेली आहे. प्र. वादी नं.३ उत्तम भानुदास मते हा मौजे माळेवाडी खालसा ता. नेवासा येथील कायमचा रहिवासी होता. सदर प्र. वादी नं.३ चे नावावर दावा मिळकत मौजे माळेवाडी खालसा ता. नेवासा, जि.अ.नगर येथील गट नं. ४२/२/अ/२ क्षेत्र १ हे. २१ आर हे क्षेत्र वाटपाने आलेले होते. प्र.वादी नं.३ हा सुमारे नऊ वर्षापेक्षाही जास्त कालावधीपासून बेपत्ता असून वादी नं.१ ते ३ हे त्याचे कायदेशिर वारस आहे. वादी व त्यांचे नातेवाईक यांनी दि.०८/०९/२०१६ पासून प्र. वादी नं.३ चा सर्वत्र शोध घेतला परंतू तो सापडला नाही अथवा अद्यापपावेतो सदर प्र.वादी नं.३ कुणासही कुठेही दिसलेला नाही. प्र.वादी नं.३ हा नऊ वर्षापेक्षाही जास्त कालावधी होऊनही आजपावेतो सापडलेला नाही, त्यामुळे वादी यांना सदरचा दावा प्र. वादी विरुद्ध प्र. वादी नं.३ चा दिवाणी मृत्यू झाला आहे, असा जाहीर ठराव होवून मिळणे गरजेचे व आवश्यक आहे व मौजे माळेवाडी खालसा, ता. नेवासा येथील गट नं.४२/२/अ/२ क्षेत्र १ हे. २१ आर या शेतजमिनीस वादी नं.१ ते ३ यांची कायदेशिर वारस म्हणून नोंद होणे गरजेचे व आवश्यक आहे. वादी यांनी प्र.वादी नं.२ यांचेकडे वारस नोंद लावण्यासाठी विनंती अर्ज केला, परंतू प्र. वादी नं.२ यांनी वरीलप्रमाणे वादी नं. १ ते ३ यांची वारस नोंद करण्यास स्पष्टपणे नकार दिला. म्हणून प्र. वादी नं.१ ते ३ यांचेविरुद्ध सदरचा दावा वादींना प्र.वादी नं.३ याचा दिवाणी मृत्यु झाला आहे असे घोषित होऊन मिळणेसाठी दाखल केलेला आहे

तरी उत्तम भानुदास मते, (परागंदा) यांना वादी हेच एकमेव वारस नाहीत असे कोणाचे म्हणणे असेल तर त्यांनी ही जाहिर नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन दि. २४/०९/२०२६ या नेमलेल्या तारखेच्या दिवशी स्वतः अगर वकिलामार्फत सर्व कागदपत्रानिशी या न्यायालयात उपस्थित रहावे. उपस्थितीत राहण्यास कसुर केल्यास न्यायालय पुरावा घेऊन योग्य ते आदेश पारीत करेल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक १३/०८/२०२६ रोजी माझे सहीनिशी व न्यायालयाच्याशिक्यानिशी दिले असे.

हुकूमावरुन

**कामगिरी लिपिक**
**दिवाणी न्यायालय, वरीष्ठ स्तर, नेवासा**

शिक्का

**अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय, वरीष्ठ स्तर, नेवासा**

### जाहिर प्रगटन

तहसिल कार्यालय नेवासा
क्रमांकः जन्म-मृत्यु/एस/आर/११५/२०२६
नेवासा दिनांक : ०६/०८/२०२६

अर्जदार श्री श्रीम-महेक आबेद शेख, रा.चांदा, नेवासा यांनी तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी नेवासा यांचे कार्यालयास अर्ज सादर करुन श्री/श्रीम./कु. महेक आबेद शेख, रा.चांदा, ता. नेवासा यांचे महाराष्ट्र जन्म मृत्यु नोंदणी कायदा १९६९ चे कलम १३(३) अन्वये जन्म नोंद गावी जन्म-मृत्यु रजिस्टरला न झाल्याने सदरची नोंद होणेकामी योग्य तो आदेश देणेत यावा याकामी इकडेस अपिल दाखल केले आहे. सदरच्या अर्जात खालील प्रमाणे जन्म नोंद होणे बाबत नमुद केलेले आहे.

अ.क्र.१, जन्म नोंद घेण्यात येणाऱ्या व्यक्तीचे नाव-महेक आबेद शेख, गावाचे नाव-चांदा, जन्म दिनांक-०७/०२/२००५

करिता या जाहिर प्रगटनादवारे सुचित करण्यात येते की, वरील व्यक्तीचे महाराष्ट्र जन्म-मृत्यु नोंदणी कायदा १९६९ चे कलम १३(३) अन्वये जन्म नोंद गावी जन्म-मृत्यु रजिस्टरला घेणेबाबत कोणाचे आक्षेप असल्यास आवश्यक त्या कागदपत्रांच्या प्रतीसह आक्षेप लेखी स्वरुपात या जाहीर प्रगटना तारखेपासुन १५ दिवसाचे आत सादर करावा. मुदतीत आक्षेप प्राप्त न झाल्यास संबधित निबंधकास जन्म मृत्यु नोंदणी पुस्तकामध्ये नोंद करणेबाबत आदेशीत करण्यात येईल.

**तहलिसदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी नेवासा**

### जाहिर प्रगटन

तहसिल कार्यालय नेवासा
क्रमांकः जन्म-मृत्यु/एस/आर/२३४/२०२६
नेवासा दिनांक : ०६/०८/२०२६

अर्जदार श्री श्रीम-इस्त्राईल इस्माईल कुरेशी, रा.चांदा, नेवासा यांनी तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी नेवासा यांचे कार्यालयास अर्ज सादर करुन श्री/श्रीम./कु. इस्त्राईल इस्माईल कुरेशी, रा.चांदा, ता. नेवासा यांचे महाराष्ट्र जन्म मृत्यु नोंदणी कायदा १९६९ चे कलम १३(३) अन्वये जन्म नोंद गावी जन्म-मृत्यु रजिस्टरला न झाल्याने सदरची नोंद होणेकामी योग्य तो आदेश देणेत यावा याकामी इकडेस अपिल दाखल केले आहे. सदरच्या अर्जात खालील प्रमाणे जन्म नोंद होणे बाबत नमुद केलेले आहे.

अ.क्र.१, जन्म नोंद घेण्यात येणाऱ्या व्यक्तीचे नाव-इस्त्राईल इस्माईल कुरेशी, गावाचे नाव-चांदा, जन्म दिनांक-१८/०५/१९८७

करिता या जाहिर प्रगटनादवारे सुचित करण्यात येते की, वरील व्यक्तीचे महाराष्ट्र जन्म-मृत्यु नोंदणी कायदा १९६९ चे कलम १३(३) अन्वये जन्म नोंद गावी जन्म-मृत्यु रजिस्टरला घेणेबाबत कोणाचे आक्षेप असल्यास आवश्यक त्या कागदपत्रांच्या प्रतीसह आक्षेप लेखी स्वरुपात या जाहीर प्रगटना तारखेपासुन १५ दिवसाचे आत सादर करावा. मुदतीत आक्षेप प्राप्त न झाल्यास संबधित निबंधकास जन्म मृत्यु नोंदणी पुस्तकामध्ये नोंद करणेबाबत आदेशीत करण्यात येईल.

**तहलिसदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी नेवासा**

### जाहिर प्रगटन

तहसिल कार्यालय नेवासा
क्रमांकः जन्म-मृत्यु/एस/आर/२३५/२०२६
नेवासा दिनांक : ०६/०८/२०२६

अर्जदार श्री श्रीम-संजय नारायण डाके, रा.चांदा, नेवासा यांनी तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी नेवासा यांचे कार्यालयास अर्ज सादर करुन श्री/श्रीम./कु. गणेश संजय डाके, रा.चांदा, ता. नेवासा यांचे महाराष्ट्र जन्म मृत्यु नोंदणी कायदा १९६९ चे कलम १३(३) अन्वये जन्म नोंद गावी जन्म-मृत्यु रजिस्टरला न झाल्याने सदरची नोंद होणेकामी योग्य तो आदेश देणेत यावा याकामी इकडेस अपिल दाखल केले आहे. सदरच्या अर्जात खालील प्रमाणे जन्म नोंद होणे बाबत नमुद केलेले आहे.

अ.क्र.१, जन्म नोंद घेण्यात येणाऱ्या व्यक्तीचे नाव-गणेश संजय डाके, गावाचे नाव-चांदा, जन्म दिनांक-२९/०३/२००३

करिता या जाहिर प्रगटनादवारे सुचित करण्यात येते की, वरील व्यक्तीचे महाराष्ट्र जन्म-मृत्यु नोंदणी कायदा १९६९ चे कलम १३(३) अन्वये जन्म नोंद गावी जन्म-मृत्यु रजिस्टरला घेणेबाबत कोणाचे आक्षेप असल्यास आवश्यक त्या कागदपत्रांच्या प्रतीसह आक्षेप लेखी स्वरुपात या जाहीर प्रगटना तारखेपासुन १५ दिवसाचे आत सादर करावा. मुदतीत आक्षेप प्राप्त न झाल्यास संबधित निबंधकास जन्म मृत्यु नोंदणी पुस्तकामध्ये नोंद करणेबाबत आदेशीत करण्यात येईल.

**तहलिसदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी नेवासा**

# प्रोफेसर कॉलनी चौकात रंगला क्रीडोत्सव!

## हॉकी, मल्लखांब, तलवारबाजी, सायकलींगसह विविध खेळांच्या प्रात्यक्षिकांनी वेधले नागरिकांचे लक्ष

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त सावेडी येथील प्रोफेसर कॉलनी चौक शनिवारी (दि. २९ ऑगस्ट) विविध क्रीडा प्रकारांच्या प्रात्यक्षिकांनी अक्षरशः गजबजून गेला. हॉकी, सायकलिंग, मल्लखांब, रायफल शूटिंग, तलवारबाजी, ज्युदो, कुस्ती, बॉक्सिंग, खो-खो आणि बास्केटबॉल अशा विविध खेळांच्या थरारक प्रात्यक्षिकांनी उपस्थित नागरिकांचे लक्ष वेधून घेतले. खेळातून आरोग्य, शिस्त आणि जिद्द निर्माण होते, असा संदेश देत या उपक्रमातून शहरात क्रीडा संस्कृती रुजविण्याचे आवाहन करण्यात आले.

खेळामुळे जीवनात शिस्त निर्माण होते. अपयश पचवून पुन्हा प्रयत्न करण्याची आणि यशाची पायरी चढण्याची जिद्द खेळातून निर्माण होते, असे प्रतिपादन महापालिका आयुक्त यशवंत डांगे यांनी केले.

जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, जिल्हा क्रीडा परिषद अहिल्यानगर, जिल्हा ऑलिंपिक संघटना, एकविध खेळ संघटना आणि विविध क्रीडा मंडळांच्या संयुक्त विद्यमाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. सकाळपासूनच प्रोफेसर कॉलनी चौकात खेळाडू, प्रशिक्षक, पालक आणि क्रीडाप्रेमी नागरिकांची मोठी गर्दी झाली होती. त्यामुळे संपूर्ण परिसराला क्रीडोत्सवाचे स्वरूप प्राप्त झाले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी प्रोफेसर कॉलनी चौकातील छत्रपती संभाजी महाराज यांच्या पुतळ्यास तसेच ऑलिंपिकवीर मेजर ध्यानचंद यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर सागर अलचेट्टी व ग्रुप यांच्या मार्गदर्शनाखाली झुंबा नृत्याने कार्यक्रमाची सुरुवात झाली.

यावेळी महापालिका आयुक्त यशवंत डांगे, शहर वाहतूक शाखेचे पोलीस निरीक्षक महेश पाटील, जिल्हा क्रीडा अधिकारी ज्ञानेश्वर खुरंगे, नगरसेवक करण कराळे, पुष्कर कुलकर्णी, सतीश शिंदे, मनोज दुल्लम, शिवछत्रपती पुरस्कारप्राप्त सुनील जाधव, कोमल वाकळे, मनीषा पुंडे, ज्येष्ठ पत्रकार मोहनीराज लहाडे, अल्ताफ कडकाले, सुधीर चपळगावकर, वेदपाल तनवर आदी



मान्यवर उपस्थित होते.

जिल्हा क्रीडा अधिकारी ज्ञानेश्वर खुरंगे यांनी प्रास्ताविकात राष्ट्रीय क्रीडा दिनाची पार्श्वभूमी सांगताना क्रीडा संस्कृतीच्या संवर्धनासाठी समाजातील प्रत्येक घटकाने योगदान देण्याची गरज व्यक्त केली. भारत देश २०३० कॉमनवेल गेम्स व २०३६ ऑलिंपिक गेम्स आयोजनाचा प्रमुख दावेदार म्हणून ओळखला जात आहे. अशा उपक्रमांमधून नव्या पिढीला खेळाची प्रेरणा मिळेल, असे त्यांनी सांगितले.

चंद्रकांत काळोखे यांनी हॉकीचे महान खेळाडू आणि ऑलिंपिकवीर मेजर ध्यानचंद यांच्या जीवनकार्याची माहिती देत भारतीय हॉकीच्या विकासातील त्यांच्या योगदानावर प्रकाश टाकला.

नगरसेवक करण कराळे यांनी आरोग्यदायी जीवनासाठी मैदानी खेळांची आवश्यकता अधोरेखित केली. अहिल्यानगर शहरातून आंतरराष्ट्रीय दर्जाचे खेळाडू घडावेत आणि त्यांनी देशासाठी पदके मिळवावीत, अशी अपेक्षा व्यक्त करत त्यांनी तरुणांनी व्यसनांपासून दूर राहून खेळाकडे वळावे, असे आवाहन केले.

महापालिका आयुक्त यशवंत डांगे म्हणाले, खेळ केवळ मनोरंजनाचे साधन नसून त्यातून व्यक्तिमत्त्व विकास आणि करिअरच्या संधी निर्माण होतात. पालकांनी आपल्या मुलांना मैदानी खेळांसाठी प्रोत्साहित करावे. खेळाडूला अपयशातून पुन्हा उभे राहण्याची ताकद खेळ देतो. माजी जिल्हा क्रीडा अधिकारी भाग्यश्री बिले यांच्या कार्याचा पाठ्यपुस्तकात समावेश असल्याचा उल्लेख करून त्यांनी खेळाच्या माध्यमातून समाजात कायमस्वरूपी ठसा उमटविता येतो, असे सांगितले. शहरात क्रीडा सुविधा निर्माण करण्यासाठी महापालिकेच्या माध्यमातून प्रयत्न सुरू असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

कार्यक्रमातील विविध क्रीडा प्रात्यक्षिके हे विशेष आकर्षण ठरले. अहिल्यानगर जिल्हा हॉकी संघटनेच्या वतीने असिफ शेख यांच्या प्रशिक्षणार्थींनी हॉकी खेळाचे, सायकलिंग संघटनेचे प्रा. संजय साठे व संभाजी मोहिते यांच्या मार्गदर्शनाखाली सायकलिंग खेळांचे, मल्लखांब संघटनेचे नंदेश शिंदे व श्रीरंग कुलकर्णी यांच्या प्रशिक्षणार्थींनी मल्लखांब खेळाचे, प्रियदर्शनी पब्लिक स्कूल भिंगार येथील प्रशिक्षक सुदर्शन कोतकर यांच्या प्रशिक्षणार्थींनीं रोलर हॉकी, रायफल शूटिंग संघटनेच्यावतीने ऋषिकेश दरंदले व अलिम शेख यांच्या प्रशिक्षणार्थींनी रायफल व पिस्तूल शूटिंग खेळांचे, तलवारबाजी संघटनेच्या वतीने वैष्णवी गोडाळकर यांच्या मार्गदर्शनाखाली तलवारबाजी खेळाचे, अहिल्यानगर जिल्हा जुदो व कुराश संघटनेच्या वतीने प्रा.संजय धोपावकर व आदित्य धोपावकर यांच्या प्रशिक्षणार्थींनी ज्युदो व कुराश खेळाचे, जिल्हा कुस्तीगीर संघाच्या वतीने निलेश मदने यांच्या प्रशिक्षणार्थींनी कुस्ती खेळाचे, जिल्हा बॉक्सिंग संघटनेच्या वतीने शकील शेख यांच्या प्रशिक्षणार्थींनी बॉक्सिंग खेळाचे, बाणेश्वर क्रीडा मंडळाच्या गणेश वारुळे व रामेश्वर चेमटे यांच्या प्रशिक्षणार्थींनी खो-खो, बास्केटबॉल जिल्हा संघटनेच्या वतीने सचिन भापकर यांच्या प्रशिक्षणार्थींनी बास्केटबॉलचे प्रात्यक्षिक सादर केले, समर्थ विद्यामंदिर व जय बजरंग विद्यालय सावेडीच्या विद्यार्थ्यांनी ढोल पथक व मिरवणूक काढली. विशेषतः पुरलेला मल्लखांब आणि रोप मल्लखांबाच्या चित्तथरारक कसरतींनी उपस्थितांच्या अंगावर रोमांच उभे केले. मल्लखांबपटूंनी सादर केलेल्या विविध कसरतींना नागरिकांनी टाळ्यांच्या कडकडाटात उत्स्फूर्त दाद दिली. क्रीडा दिनाच्या निमित्ताने सायकलिंगला प्रोत्साहन देण्यासाठी इन्फिनिटी सायक्लोथॉन, अहिल्यानगर, बाईक टेक पॉइंट आणि सायकलिंग असोसिएशन महाराष्ट्र यांच्या वतीने शहर वाहतूक शाखेचे पोलीस निरीक्षक महेश पाटील यांना सायकल भेट देण्यात आली.

## द • ख • ल



### बँकेची प्रगती ही सर्वांचीच फलश्रुती : गिंताजली शेळके

**निघोज :** जी.एस.महानगर बँकेच्या प्रगतीमध्ये प्रत्येक कर्मचारी बांधवाचे योगदान मोलाचे असून,बँकेची प्रगती ही बँकेतील सर्व कर्मचारी,अधिकारी,संचालक मंडळ,सभासद आणि त्यांच्या कुटुंबीयांच्या योगदानामुळे साध्य झाली आहे.कर्मचारी हित,कल्याण आणि प्रगतीसाठी एकजुटीने काम करणे आवश्यक आहे बँकेची प्रगती ही सर्वांचीच फलश्रुती आहे. यावेळी भास्कर गुंडे, कैलास गायकवाड, शांताराम झावरे, चंद्रकांत खोसे यांच्यासह पदाधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. सभेच्या निमित्ताने सभासदांच्या गुणवंत पाल्यांचा उल्लेखनीय यशाबद्दल सत्कार करण्यात आला. त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शेळके यांनी शुभेच्छा दिल्या. तसेच सोसायटीच्या वतीने सर्व सभासदांना बॅगचे वाटप करण्यात आले.

### सहकारातून ग्रामीण महाराष्ट्र घडविणारे पहिले सहकारमहर्षी डॉ. विठ्ठलराव विखे पाटील : गुंड



**निघोज :** शेतकऱ्याला केवळ आर्थिकदृष्ट्या सक्षम न करता त्याला विकासाच्या केंद्रस्थानी ठेवून ग्रामीण समाजाच्या सर्वांगीण उन्नतीची चळवळ उभी करणारे पद्मश्री सहकारमहर्षी डॉ. विठ्ठलराव विखे पाटील हे देशातील पहिले सहकारमहर्षी होत. त्यांनी सहकाराच्या माध्यमातून ग्रामीण महाराष्ट्राच्या विकासाची मुहूर्तमेढ रोवली. आशिया खंडातील पहिला सहकारी साखर कारखाना उभारून त्यांनी शेतकऱ्यांच्या हातात विकासाचे प्रभावी साधन दिले. त्यांच्या दूरदृष्टीमुळे महाराष्ट्राच्या सहकार चळवळीला व्यापक अधिष्ठान मिळाले, असे प्रतिपादन बबनराव गुंड सर यांनी केले. प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेचे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अळकुटी येथे पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील यांच्या १२६ व्या पुण्यतिथीनिमित्त आयोजित व्याख्यान व अभिवादन कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी दिनेश बाबर, भाऊसाहेब डेरे, बाळासाहेब धोत्रे, संपत जाधव, कैलास गोरडे, प्रा. डॉ कुंदा कवडे मान्यवर उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

### मूकबधिर विद्यार्थ्यांसोबत साजरा झाला प्रेमाचा रक्षाबंधन सोहळा



**पाथर्डी :** रक्षाबंधन हा केवळ राखी बांधण्याचा सण नसून प्रेम, विश्वास, आपुलकी आणि नात्यांची वीण अधिक घट्ट करणारा उत्सव आहे. याच भावनेतून संत वामनभाऊ तरुण मंडळाच्या वतीने येथील निवासी मूकबधिर विद्यालयातील विद्यार्थ्यांसोबत रक्षाबंधनाचा आगळावेगळा आणि भावनिक सोहळा उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी विद्यार्थ्यांना राखी, मिठाई तसेच शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमासाठी संत वामनभाऊ तरुण मंडळाचे अध्यक्ष तथा शिवव्याख्याते सचिन नागापुरे, संस्थेचे अध्यक्ष नंदकुमार डाळिंबकर यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या अध्यक्षा म्हणून पाथर्डी नगरपरिषदेच्या गटनेत्या तथा नगरसेविका डॉ. शारदाताई गर्जे उपस्थित होत्या. यावेळी ज्योती शर्मा, अंजना गायकवाड, शीला बडे, मंदाकिनी तुपे, राखी लुनावत, चंद्रकला गायकवाड, सारिका जेधे यांच्यासह संत वामनभाऊ महिला मंडळाच्या सदस्यांची उपस्थिती होती.

## स्नेहालय बालभवनातील बालिकांनी बांधल्या वकील बांधवांना राख्या



**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** रक्षाबंधनाच्या पवित्र सणाच्या पार्श्वभूमीवर बहीण-भावाच्या नात्यातील प्रेम, जिव्हाळा आणि आपुलकी वृद्धिंगत करणारा अनोखा उपक्रम जिल्हा न्यायालय, अहिल्यानगर येथील सेंट्रल डव्होकेट बारमध्ये उत्साहात पार पडला. स्नेहालयाच्या मलाला व उत्कर्ष या दोन बालभवनांतील बालिकांनी सेंट्रल डव्होकेट बारमध्ये उपस्थित राहून बारमधील वकील बांधवांना राख्या बांधल्या. या उपक्रमामुळे न्यायालयीन परिसरात स्नेह, माया आणि बहीण-भावाच्या नात्याची भावनिक वातावरण निर्माण झाले होते.

रक्षाबंधन हा केवळ राखी बांधण्याचा सण नसून परस्परांप्रती प्रेम, विश्वास, संरक्षण, जिव्हाळा आणि सामाजिक बांधिलकी व्यक्त करण्याचा दिवस आहे. याच भावनेतून स्नेहालयाच्या मलाला व उत्कर्ष बालभवनातील मुलींनी वकील बांधवांना राख्या बांधत सामाजिक सलोखा आणि बंधुभावाचा संदेश दिला. विविध क्षेत्रांत कार्यरत असलेल्या व्यक्तींमध्ये स्नेहाचे आणि आपुलकीचे नाते निर्माण व्हावे, तसेच समाजातील प्रत्येक घटकाने एकमेकांच्या सुख-दुःखात सहभागी व्हावे, हा या उपक्रमामागील उद्देश होता.

या प्रसंगी सेंट्रल ॲडव्होकेट बारचे अध्यक्ष ॲड. फारुक बी. शेख, ॲड. सौरभ काकडे, ॲड. के. एम. देशपांडे, ॲड. बिहानी, ॲड. पिंगळे, ॲड. एस. जे. काकडे, ॲड. अभिजीत देशपांडे, ॲड. मृणाली वाळुंज यांच्यासह बारमधील अनेक ज्युनिअर ॲडव्होकेट्स उपस्थित होते.

ॲड. फारुख शेख यांच्या वतीने तसेच ॲड. के. एम. देशपांडे यांच्या वतीने बालिकांना खाऊ व भेटवस्तू देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. वकील बांधवांकडून मिळालेल्या या प्रेमळ प्रतिसादामुळे बालिकांच्या आनंदात आणखी भर पडली. या उपक्रमातून रक्षाबंधनाच्या पारंपरिक भावनेला सामाजिक बांधिलकीची जोड मिळाली. समाजातील वंचित व गरजू घटकांतील मुला-मुलींना आपुलकीची व सुरक्षिततेची भावना मिळावी, त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण व्हावा आणि समाजातील विविध घटकांनी त्यांच्याशी स्नेहाचे नाते जोडावे, यासाठी अशा उपक्रमांचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले.

## जालिंदर बोरुडे यांना 'नेत्र गौरव' पुरस्कार

**अहिल्यानगर :** सामाजिक कार्यकर्ते तथा 'नेत्रदूत' म्हणून ओळख असलेले जालिंदर बोरुडे यांना नेत्रदानाच्या क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल साई सूर्य नेत्रसेवेच्या वतीने 'नेत्र गौरव' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.



फिनिक्स सोशल फाउंडेशनच्या माध्यमातून गेल्या तब्बल ३४ वर्षांपासून बोरुडे सातत्याने नेत्रसेवा, मोफत नेत्रशिबिरे, मोतिबिंदू शस्त्रक्रिया तसेच मरणोत्तर नेत्रदानाबाबत जनजागृतीचे कार्य करीत आहेत. त्यांच्या या निस्वार्थ सामाजिक कार्याची दखल घेत त्यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. या कार्यक्रमास रोटरी क्लबचे शिरीष रायते, ऑफ्थॅल्मोलॉजीचे अध्यक्ष डॉ. रावसाहेब बोरुडे, डॉ. राजीव चिट गोपीकर, साई सूर्य नेत्रसेवेचे डॉ. प्रकाश कांकरिया, डॉ. सुधा कांकरिया आदी उपस्थित होते. जालिंदर बोरुडे यांनी फिनिक्स सोशल फाउंडेशनच्या माध्यमातून ग्रामीण व शहरी भागातील गरजू नागरिकांपर्यंत नेत्रसेवेचा लाभ पोहोचविण्याचे काम केले आहे.



## अपयशानंतरही खेळच खेळाडूंना उभे रहायला शिकवतो : प्रा. खिलारी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**टाकळी ढोकेश्वर :** देशातील प्रत्येक यशस्वी खेळाडूची मेहनत आणि जिद्द लाखो तरुणांसाठी प्रेरणादायी आहे. राष्ट्रीय क्रीडा दिवस साजरा करण्याचा हेतू म्हणजे तरुणांमध्ये खेळाची आवड निर्माण करणे तसेच आरोग्य आणि तंदुरुस्तीबद्दल जागरुकता वाढवणे आणि खेळाडूंच्या योगदानाचा सन्मान करणे हा आहे.खेळ हा माणसाला फक्त जिंकायला नाही तर हरल्यावर उभे राहायला शिकवतो असे प्रतिपादन प्राचार्य बाळासाहेब खिलारी यांनी केले. या प्रसंगी प्रा. भरत राठोड यांनी विद्यार्थ्यांना दहावी व बारावी नंतर होणाऱ्या विविध क्षेत्रातील बहुपर्यायी परीक्षा पद्धती यावर मार्गदर्शन केले. यावेळी रवींद्र मते, कल्पना जाधव, बाळासाहेब निवडुंगे यांनी विद्यार्थ्यांना रक्षाबंधन व खेळाचे महत्व सांगितले. यावेळी श्रीरंग धामणे, संदीप महांडुळे, नारायण शेळके, वैशाली गायखे, सुमन वाळुंज, प्रिया डव्हणे,सुरेखा ठाणगे, सोनल रोहकले, वर्षा भोंडवे, संदीप खिलारी, मिनाक्षी पवार, सोनाली माळवदे, स्वाती भालेकर, साक्षी ससाणे, संतोष अडसूळ, सुदेश मुंडे, प्रणय ढुस, प्रिया नसवाले, करुणा जाधव, निलम झावरे, शिरीष राऊत, पवन कुटे, अनुष्का कांबळे, अमोल गोरे, नारायण हरेल, सुनीता घोडके आदी शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

## वांबोरी चारीवरील अनधिकृत कनेक्शन घेणाऱ्यावर गुन्हे दाखल करा : मागणी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**करंजी :** पाथर्डी तालुक्याच्या पश्चिम भागात सध्या भीषण दुष्काळजन्य परिस्थिती निर्माण झाली असून, जनावरांच्या पिण्याच्या पाण्याचाही प्रश्न गंभीर झाला आहे. अशा परिस्थितीत वांबोरी चारीला पाणी सोडण्याची प्रक्रिया सुरू झाली असताना वांबोरी, खडांबे, गुंजाळे परिसरातील वांबोरी चारीच्या पाइपलाइनवरील अनधिकृत कनेक्शन तात्काळ काढावीत, तसेच संबंधितांवर गुन्हे दाखल करावेत, अशी मागणी डोंगरवाडी चे सरपंच उद्धव गीते, गीतेवाडीचे सरपंच जनार्धन गीते, शिराळचे सरपंच पिनू मुळे, भोसे गावचे सरपंच बाळासाहेब टेमकर यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे केली आहे. वांबोरी परिसरात काही दिवसांपूर्वी मुळा पाटबंधारे विभागाच्या शाखा अभियंत्यांनी अकरा अनधिकृत कनेक्शन काढली. मात्र, कनेक्शन घेणाऱ्यांवर कोणतीही कायदेशीर कारवाई झाली नसल्याने पुन्हा अनधिकृत कनेक्शन घेण्याचे प्रकार सुरू राहण्याची शक्यता शेतकऱ्यांनी व्यक्त केली आहे. सध्या आणखी सुमारे १६ ठिकाणी अनधिकृत कनेक्शन असल्याचा दावा शेतकरी आहेत. पाइपलाइनवरील अनधिकृत कनेक्शन, व्हॉल्व्ह काढून नेणे तसेच व्हॉल्व्हमध्ये छेडछाड करून पाणी घेण्याचे प्रकार होत असल्याने चारीच्या शेवटच्या टप्प्यातील गावांना पुरेशा दाबाने पाणी मिळत नसल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे. तीनही मोटारी सुरू केल्यानंतरही डीसी-२ पर्यंत पुरेशी पाणीपातळी पोहोचत नसल्याने पुढील गावांना पाणी मिळण्यात अडथळा निर्माण होत आहे.

## श्रीगोंदा तालुक्यात खरीप पिकांवर पावसाच्या ताणाचे सावट

**दादा सोनवणे । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीगोंदा :** पावसाळ्यातील शेतकऱ्यांच्या सर्वाधिक अपेक्षेचा काळ असलेला श्रावण महिना यंदा श्रीगोंदा तालुक्यात निराशाजनक ठरत आहे. श्रावणाच्या सुरुवातीला काही प्रमाणात पावसाने हजेरी लावल्यानंतर शेतकऱ्यांच्या आशा पल्लवित झाल्या होत्या. मात्र त्यानंतर पावसाने मोठी उघडीप दिल्याने शेतशिवारातील खरीप पिकांची वाढ मंदावली असून, जमिनीतील ओलावा दिवसेंदिवस कमी होत आहे. त्यामुळे कापूस, मका, तूर यासह विविध खरीप पिकांवर पाण्याच्या ताणाचे सावट निर्माण झाले आहे.

श्रावण म्हणजे निसर्ग, शेती आणि भक्तीचा संगम. या महिन्यात पावसाच्या सरींनी शेतशिवार हिरवेगार झालेले असते. पिकांची जोमाने वाढ सुरू होते आणि शेतकऱ्यांच्या डोळ्यांसमोर उत्पादनाचे स्वप्न आकार घेऊ लागते. यंदाही श्रावणाच्या प्रारंभी झालेल्या पावसामुळे शेतकऱ्यांना खरीप हंगाम चांगला जाण्याची अपेक्षा होती. मात्र पावसाने अचानक विश्रांती घेतल्याने शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे.

श्रीगोंदा तालुक्यातील अनेक भागांत कापूस, मका आणि तूर पिकांची वाढ अपेक्षित वेगाने होत नसल्याचे चित्र आहे. काही ठिकाणी पिकांची पाने कोमेजण्यास सुरुवात झाली असून, जमिनीतील ओलावा कमी झाल्याने पिकांना ताण जाणवू लागला आहे. श्रावणात पिकांची वाढ जोमाने होण्याबरोबरच फुलोरा व शेंगा लागण्याची प्रक्रिया सुरू होते. मात्र पावसाची उघडीप कायम राहिल्यास या महत्त्वाच्या अवस्थेवर परिणाम होण्याची शक्यता आहे.

खत, बियाणे, मशागत, तणनियंत्रण आणि फवारण्यांवर शेतकऱ्यांनी मोठा खर्च केला आहे. पिके हातात येण्याच्या टप्प्यावर असताना आता त्यांना पाण्याची गरज निर्माण झाली आहे. मात्र आकाशात ढग दाटून येतात, वाऱ्याची झुळूक येते आणि शेतकऱ्यांच्या नजरा आभाळाकडे लागतात; पण अपेक्षित दमदार पाऊस मात्र पडत नाही. त्यामुळे 'ढग आले, पण पाऊस नाही' अशी परिस्थिती अनेक भागांत दिसून येत आहे.

श्रीगोंदा तालुक्यातील मागील काही वर्षांच्या ऑगस्ट महिन्यातील पर्जन्यमानाकडे पाहिले तर पावसाच्या प्रमाणात मोठी चढ-उताराची स्थिती दिसून येते. त्या तुलनेत यंदा ऑगस्टमध्ये पावसाची कमतरता प्रकर्षाने जाणवत आहे.

## पावसाने फिरवली पाठ ; पशुधन जगविण्याचेही संकट!

### चारा टंचाईने पशुपालक हवालदिल; चारा डेपो सुरू करण्याची मागणी

### पशुपालक आ. अक्षय कर्डिलेंची घेणार भेट

**शशिकांत पवार । राष्ट्र सह्याद्री**

**नगर तालुका :** पावसाळ्याचे तीन महिने उलटून गेले तरी नगर तालुक्यात अद्यापही दमदार पावसाची प्रतीक्षा कायम आहे. पावसाअभावी खरीप हंगाम संकटात सापडला असून त्याची झळ थेट पशुधनालाही बसू लागली आहे. डोंगररांगांमध्येही चारा उपलब्ध नाही अन् चारा पिकांची दयनीय अवस्था झाली आहे. चाऱ्याचा प्रश्न गंभीर बनला असून चारा डेपो सुरू करण्याची मागणी शरद तोडमल यांनी केली आहे.

पावसाअभावी चारा पिकांची वाढ झालेली नाही. खरीप हंगामातील पिकांचीही पाण्याअभावी दयनीय अवस्था झाली आहे. त्यामुळे शेतातून जनावरांना चारा मिळण्याची आशा मावळली असून बाहेरून चारा खरेदी करण्याची वेळ पशुपालकांवर आली आहे. चा-याअभावी पशुधन जगविणे कठीण झाले आहे.



> पाऊस नाही शेतात चारा नाही आणि जलसाठेही कोरडे आहेत. अशा परिस्थितीत पशुधन जगवायचे कसे हा प्रश्न आमच्यासमोर उभा आहे. चारा डेपो सुरू करून पशुपालकांना दिलासा द्यावा.
>
> **प्रणव पवार**

**आ. अक्षय कर्डिले यांची घेणार भेट!**

तालुक्यात चारा डेपो सुरू करण्यासाठी आ. अक्षय कर्डिले यांची भेट घेण्यात येणार असल्याची माहिती शरद तोडमल, गोरख तोडमल, प्रणव पवार व प्रमोद पवार यांनी दिली. सध्याची दुष्काळी परिस्थिती, चारा-पाणी टंचाई तसेच पशुपालकांच्या अडचणींमुळे चारा डेपो सुरू करण्यासाठी तसेच पशुधन वाचविण्यासाठी उपाययोजना करण्याची मागणी आमदार अक्षय कर्डिले यांच्याकडे करण्यात येणार आहे.

पावसाने दडी मारल्याने तालुक्यातील सर्वच तलाव, बंधारे आणि जलसाठे कोरडेठाक पडले आहेत. भूजल पातळीत वाढ न झाल्याने अनेक गावांमध्ये अद्यापही पिण्याच्या पाण्याची गंभीर समस्या कायम आहे. अनेक गावांना पिण्याच्या पाण्यासाठी टँकरचा आधार घ्यावा लागत आहे.

माणसांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर असताना जनावरांसाठी पाणी आणि चारा कुठून आणायचा हा प्रश्न पशुपालकांना सतावत आहे. पशुधन हेच अनेक शेतकरी कुटुंबांच्या उदरनिर्वाहाचे प्रमुख साधन आहे. चारा-पाण्याअभावी जनावरे जगविण्याचे मोठे संकट निर्माण झाले आहे.

पावसाळ्यातच अशी विदारक परिस्थिती निर्माण झाल्याने पुढील काळाबाबत शेतकऱ्यांच्या चिंतेत भर पडली आहे. पाऊस न झाल्यास चारा टंचाई आणखी तीव्र होण्याची शक्यता आहे. त्यामुळे प्रशासनाने परिस्थितीचे गांभीर्य ओळखून तालुक्यात तातडीने चारा डेपो सुरू करावा आणि पशुपालकांना चारा उपलब्ध करून द्यावा अशी मागणी शरद तोडमल यांच्यासह तालुक्यातील पशुपालकांकडून करण्यात येत आहे.

# तळेगाव-चाकण-शिक्रापूर रस्त्याच्या दुरुस्तीला वेग

## ४० किमी रस्त्याची दोन दिवसांत, तर १४ किमी रस्त्याची चार दिवसांत दुरुस्ती

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**पुणे :** तळेगाव-चाकण-शिक्रापूर (रा.म.-५५) राष्ट्रीय महामार्ग क्र. ५४८-डी या महत्त्वाच्या औद्योगिक व वाहतूक मार्गाची पावसाळ्यात झालेली दुरवस्था लक्षात घेऊन सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्या निर्देशानुसार दुरुस्तीची कामे युद्धपातळीवर सुरू करण्यात आली आहेत.या मार्गाची एकूण लांबी ५४ किलोमीटर असून, तुलनेने कमी खराब झालेल्या सुमारे ४० किलोमीटर रस्त्याची दुरुस्ती पुढील दोन दिवसांत पूर्ण करण्याचे नियोजन आहे. एमआयडीसी पट्ट्यातील सुमारे १४ किलोमीटर रस्त्याची अधिक दुरवस्था झाली असून, या भागातील खड्डे बुजविणे, साईड शोल्डरची दुरुस्ती आणि आवश्यक भरावाची कामे चार दिवसांत पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. वाढती वाहतूक लक्षात घेऊन मार्गावरील सुमारे १२ किलोमीटर रस्त्याचे रुंदीकरण पुढील दोन महिन्यांत पूर्ण करण्याचे नियोजन आहे.गेल्या वर्षीच्या अनुभवाच्या पार्श्वभूमीवर या मार्गाची तातडीची दुरुस्ती एका वर्षासाठी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाऐवजी सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत करण्याचा निर्णय घेण्यात आला. तत्कालीन उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री अजित पवार आणि सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्या प्रयत्नातून दुरुस्ती व रुंदीकरणासाठी ५९ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला होता.

सार्वजनिक बांधकाम विभागाने जानेवारी २०२६ मध्ये कार्यारंभ आदेश देऊन कामाला सुरुवात केली होती. मात्र, रस्त्यालगतच्या सेवा वाहिन्यांमुळे निर्माण झालेले अडथळे आणि डांबर उपलब्धतेतील अडचणींमुळे कामाला अपेक्षित वेग मिळाला नाही. पावसाळ्यात रस्त्याची स्थिती आणखी खराब झाल्यानंतर आता कामाला गती देण्यात आली आहे. दरम्यान, मार्गाच्या कायमस्वरूपी दर्जोन्नतीसाठी महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळामार्फत (MSIDC) काम हाती घेण्यात येणार असून, पुढील तीन महिन्यांत त्यास सुरुवात करण्याचे नियोजन आहे. त्यामुळे मार्गाची वाहतूक क्षमता वाढून भविष्यातील वाहतूक कोंडी आणि रस्त्याच्या दुरवस्थेचा प्रश्न कमी होण्यास मदत होणार आहे.

## आळंदीत वृक्षांना राखी बांधून रक्षाबंधन



**आळंदी :** रक्षाबंधनानिमित्त भाऊ-बहिणीच्या नात्यासोबतच निसर्गाशी असलेले नाते दृढ करण्याचा संदेश देत जी.एन. पाटील फौंडेशनच्या वतीने सिद्धबेट व थोरल्या पादुका परिसरातील वृक्षांना राखी बांधून रक्षाबंधन साजरे करण्यात आले.या उपक्रमादरम्यान वृक्षांना राखी बांधून त्यांच्या संरक्षण व संवर्धनाचा संकल्प करण्यात आला. पर्यावरणाचे रक्षण ही प्रत्येकाची सामाजिक जबाबदारी असून, वृक्ष मानवाच्या जीवनाचा अविभाज्य घटक आहेत, असा संदेश यावेळी देण्यात आला.'वृक्ष वाचवा, पर्यावरण वाचवा' या संकल्पनेतून सामाजिक आणि पर्यावरणीय बंधुत्व जोपासण्याचा प्रयत्न या उपक्रमातून करण्यात आला. नागरिकांनीही वृक्षसंवर्धनासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन जी.एन. पाटील फौंडेशनच्या वतीने करण्यात आले.

## वडगाव निंबाळकर मध्ये भालदार कुटुंबाकडून विद्यार्थ्यांना अल्पोपहार वाटप



**सोमेश्वरनगर :** ईद-ए-मिलादुन्नबीच्या निमित्ताने वडगाव निंबाळकर (ता बारामती) येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा १ आणि २ मध्ये मोहम्मद पैगंबर (स.अ.स.) यांच्या १५०१ व्या जयंतीनिमित्त विशेष उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी फिरोज भालदार आणि भालदार कुटुंबीयांच्या वतीने शाळेतील विद्यार्थ्यांना अल्पोपहाराचे वाटप करण्यात आले.

मोहम्मद पैगंबर (स.अ.स.) यांच्या जयंतीचे औचित्य साधून विद्यार्थ्यांमध्ये प्रेम, बंधुभाव, एकोपा आणि मानवतेची भावना वृद्धिंगत करण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला. भालदार कुटुंबीयांच्या या सामाजिक उपक्रमाचे शाळेतील शिक्षक, विद्यार्थी आणि उपस्थित मान्यवरांनी कौतुक केले.या उपक्रमाद्वारे विद्यार्थ्यांना अल्पोपहाराचे वाटप करण्यात आले. धार्मिक सण-उत्सवांच्या माध्यमातून समाजात आपुलकी, सद्भावना आणि सामाजिक एकतेची भावना दृढ व्हावी, असा संदेश यावेळी देण्यात आला.या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंदाचे वातावरण निर्माण झाले. सामाजिक बांधिलकी जपत फिरोज भालदार आणि भालदार कुटुंबीयांनी राबविलेल्या या उपक्रमाचे परिसरातून स्वागत होत आहे.

## शिरूरमधील झोपडपट्टीधारकांच्या जागा नावावर करा : मनसे

**शिरूर :** शहरातील विविध झोपडपट्ट्यांमध्ये तसेच अतिक्रमणाच्या जागेवर अनेक वर्षांपासून वास्तव्यास असलेल्या नागरिकांच्या जागा शासनाच्या नियमानुसार नियमित करून त्यांच्या नावावर सनद देण्यात यावी, अशी मागणी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे जनहित व विधी विभागाचे जिल्हाध्यक्ष ॲड. स्वप्निल माळवे यांनी केली आहे.यासंदर्भात ॲड. माळवे यांनी शिरूर नगरपरिषदेचे मुख्याधिकारी पाटील यांना निवेदन देऊन शासनाने जारी केलेल्या संबंधित जीआर व आदेशांची तातडीने अंमलबजावणी करण्याची मागणी केली. या नागरिकांना त्यांच्या घराचा व जागेचा कायदेशीर आधार मिळण्यासाठी प्रशासनाने सकारात्मक भूमिका घ्यावी, असे त्यांनी म्हटले आहे.ॲड. माळवे यांनी यापूर्वी ९ एप्रिल २०२६ रोजी नगरपरिषदेसह संबंधित कार्यालयांशी पत्रव्यवहार केला होता. मात्र, अद्याप ठोस कार्यवाही झाली नसल्याचा आरोप त्यांनी केला. जिल्हाधिकारी कार्यालयातील नगर प्रशासन अधिकारी व सहआयुक्त घोलप यांनी २० जुलै २०२६ रोजी शिरूर नगरपरिषदेला संबंधित प्रकरणाचा अहवाल सादर करून उचित कार्यवाही करण्याचे निर्देश दिले होते. तरीही कार्यवाही न झाल्याबद्दल माळवे यांनी नाराजी व्यक्त केली. २७ ऑगस्ट रोजी ॲड. स्वप्निल माळवे यांनी मुख्याधिकारी पाटील यांना स्मरणपत्र देऊन सात दिवसांत कार्यवाही करण्याची मागणी केली आहे. या मुदतीत कार्यवाही न झाल्यास मोठे जनआंदोलन उभारण्याचा इशारा त्यांनी दिला आहे. तसेच, झोपडपट्टी व अतिक्रमणधारक नागरिकांच्या प्रश्नावर नगरपरिषदेच्या सर्वसाधारण सभेत ठराव मंजूर करून शासनाच्या आदेशानुसार पुढील प्रक्रिया सुरू करावी, अशी मागणी केली आहे. दरम्यान, सन २००० पूर्वीपासून अतिक्रमणाच्या जागेवर वास्तव्यास असलेल्या नागरिकांनी ओळखपत्रे, रेशनकार्ड, वीजबिल, नगरपरिषदेच्या करपावत्या, प्रतिज्ञापत्र व इतर संबंधित कागदपत्रे जमा करावीत, असे आवाहन ॲड. माळवे यांनी केले आहे. नागरिकांच्या हक्काच्या घरांसाठी शासनस्तरावर पाठपुरावा करण्याची ग्वाही त्यांनी दिली.



शिरूर नगरपरिषदेत निवेदन देताना महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे जनहित व विधी विभागाचे जिल्हाध्यक्ष ॲड. स्वप्निल माळवे.

## मटण, चिकन विक्रेत्यांना अन्नसुरक्षेचे मार्गदर्शन

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**पुणे :** 'सुरक्षित अन्न, सुरक्षित औषध, सुरक्षित महाराष्ट्र' अभियानांतर्गत मटण व चिकन विक्रेत्यांसाठी अन्नसुरक्षा आणि स्वच्छतेबाबत मार्गदर्शन कार्यशाळा भवानी पेठ येथील लक्ष्मीबाजार सांस्कृतिक भवनात आयोजित करण्यात आली. अन्न व औषध प्रशासन, पुणे विभाग आणि श्री लक्ष्मीबाजार प्रतिष्ठान ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने झालेल्या या कार्यशाळेत सुमारे २०० अन्न व्यावसायिकांनी सहभाग घेतला.

अन्न सुरक्षा आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या कार्यशाळेत मटण व चिकन विक्रीच्या ठिकाणी स्वच्छता, वैयक्तिक स्वच्छता, कच्चे व तयार अन्नपदार्थांची योग्य हाताळणी, साठवणूक, तापमान नियंत्रण, स्वच्छ पाणी, उपकरणांची स्वच्छता, कचरा व्यवस्थापन आणि कीटक नियंत्रण याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. अन्नसुरक्षा व मानके अधिनियम २००६ तसेच त्याअंतर्गत नियम व विनियमांचे पालन करण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले. ग्राहकांना सुरक्षित, स्वच्छ व गुणवत्तापूर्ण मटण आणि चिकन उपलब्ध करून देण्यासाठी व्यावसायिकांनी आवश्यक स्वच्छता व सुरक्षिततेच्या मानकांची अंमलबजावणी करावी, असे सांगण्यात आले. यावेळी अन्न व औषध प्रशासन, सहआयुक्त (अन्न) दिवाकर भोगावडे, सहाय्यक आयुक्त नारायण सरकटे आणि अन्न सुरक्षा अधिकारी सतीश हाके यांनी मार्गदर्शन केले. नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर पुढील काळातही कठोर कारवाई करण्यात येणार असल्याचे प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले.



## शेताच्या बांधावर सफरचंदाला फळधारणा

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**लोणी काळभोर :** हवेली तालुक्यातील लोणी काळभोर (सिद्राममळा) येथील शेतकरी ज्ञानेश्वर दत्तात्रेय काळभोर यांच्या शेताच्या बांधावर लावलेल्या सफरचंदाच्या झाडाला फळधारणा झाली आहे. थंड हवामानात येणाऱ्या सफरचंदाची उष्ण हवामानाच्या परिसरात झालेली फळधारणा हा शेतकऱ्यांसाठी कुतूहलाचा विषय ठरला आहे.

ज्ञानेश्वर काळभोर यांनी तीन वर्षांपूर्वी खाण्यासाठी सफरचंद आणले होते. त्यातील बिया त्यांच्या मुलगी स्नेहल हिने सहज प्रयोग म्हणून कोकोपीटमध्ये रुजवल्या. त्यातून तयार झालेले रोपटे शेताच्या बांधावर लावण्यात आले. योग्य निगा राखल्यामुळे हे झाड गेल्या तीन वर्षांत चांगले वाढले असून आता त्याला सफरचंदाची फळे लागली आहेत.

सफरचंद हे प्रामुख्याने थंड हवामानात येणारे फळपीक मानले जाते. मात्र, हवेली तालुक्यातील या प्रयोगामुळे प्रतिकूल हवामानातही सफरचंदाच्या झाडाला फळधारणा होऊ शकते, हे दिसून आले आहे. झाडाला फळधारणा झाल्याचा आनंद असून हा प्रयोग पुढील काळात सफरचंद लागवडीच्या दृष्टीने उपयुक्त ठरतो का, याकडे शेतकरी आणि कृषी क्षेत्राचे लक्ष लागले आहे, असे स्नेहल काळभोर यांनी सांगितले.

# रक्षाबंधनासाठी निघालेल्या कुटुंबावर काळाचा घाला

## ट्रक-दुचाकी अपघातात वडील-मुलीचा मृत्यू; आई गंभीर

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री




**निरगुडसर :** रक्षाबंधनासाठी माहेरी निघालेल्या कुटुंबाच्या दुचाकीला मालवाहतूक ट्रकने धडक दिल्याने झालेल्या भीषण अपघातात वडील आणि मुलीचा जागीच मृत्यू झाला. आई गंभीर जखमी झाली. हा अपघात शुक्रवारी (२८ ऑगस्ट) सायंकाळी पुणे-नाशिक महामार्गावर चाकण येथील किंगफा कंपनीजवळ घडला.

या अपघातात राजेंद्र बंडा भोर (वय ४२) आणि त्यांची मुलगी मयुरी राजेंद्र भोर (वय १४) यांचा मृत्यू झाला. तर वैशाली राजेंद्र भोर (वय ३६) गंभीर जखमी झाल्या असून त्यांच्यावर चाकण येथील खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, भोर कुटुंबीय मूळचे अवसरी खुर्द (ता. आंबेगाव) येथील असून सध्या निरगुडसर येथे वास्तव्यास होते. वैशाली भोर यांचे माहेर मावळ तालुक्यातील मिंडेवाडी येथे आहे. रक्षाबंधनानिमित्त माहेरी जाण्यासाठी राजेंद्र भोर हे पत्नी आणि मुलगी मयुरी यांच्यासह दुचाकीवरून निघाले होते. त्यांचा मुलगा शिक्षणासाठी मामाकडे असल्याची माहिती आहे. किंगफा कंपनीजवळ दुचाकीला मालवाहतूक ट्रकने धडक दिली. यात राजेंद्र भोर व मयुरी यांचा जागीच मृत्यू झाला, तर वैशाली भोर गंभीर जखमी झाल्या. अपघातानंतर ट्रकचालकाने वाहन घटनास्थळीच थांबविले.घटनेची माहिती मिळताच चाकण पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला. या प्रकरणाचा पुढील तपास सुरू आहे.राजेंद्र भोर हे चालक म्हणून काम करत होते. त्यांच्या पश्चात वृद्ध आई-वडील, पत्नी आणि एक मुलगा असा परिवार आहे. मयुरी आठवी इयत्तेत शिक्षण घेत होती. रक्षाबंधनाच्या सणासाठी निघालेल्या कुटुंबावर अचानक काळाने घाला घातल्याने निरगुडसर व अवसरी खुर्द परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

## पशुपालकांचे १ सप्टेंबरला आयुक्तालयावर धडक आंदोलन

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**पुणे :** महाराष्ट्रातील पशुपालक शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांसाठी १ सप्टेंबर रोजी औंध येथील पशुसंवर्धन आयुक्तालयावर राज्यभरातील हजारो पशुपालक शेतकरी धडक देणार आहेत. २२ जुलै २०२४ आणि ३१ जुलै २०२५ रोजी जारी करण्यात आलेल्या शासन निर्णयांची तातडीने अंमलबजावणी करावी, तसेच पशुपालकांच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष करणाऱ्या अधिकाऱ्यांची उच्चस्तरीय चौकशी करावी, अशी मागणी आंदोलनाद्वारे करण्यात येणार आहे. खाद्य व औषध कंपन्यांशी अधिकाऱ्यांचे आर्थिक संबंध आहेत का, बेकायदेशीर खाद्य-औषध विक्रीला तसेच एकतर्फी करारांद्वारे पशुपालकांचे शोषण करणाऱ्या कंपन्यांना अधिकाऱ्यांकडून संरक्षण दिले जाते का, याचीही चौकशी करावी, अशी मागणी करण्यात आली.पत्रकार परिषदेस संघटनेचे शेलार, गुरुवर्य गोपाळे, उपाध्यक्ष नंदकुमार चौधरी, समन्वय समिती सदस्य व कार्याध्यक्ष शरद बाळासाहेब गोडांबे, मावळ तालुका अध्यक्ष एकनाथ गाडे आणि महाराष्ट्र राज्य संचालक सुभाष केदारी उपस्थित होते. पशुसंवर्धन विभाग हा पशुपालकांच्या हितासाठी आहे की कंपन्यांच्या हितासाठी, असा सवाल उपस्थित करत पशुपालकांच्या मागण्यांची तातडीने दखल घेण्याची मागणी संघटनेने केली आहे.

## राष्ट्रीय क्रीडा दिन उत्साहात

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**आळंदी :** श्री ज्ञानेश्वर शिक्षण संस्था संचलित ज्ञानेश्वर विद्यालय व ज्युनिअर कॉलेजमध्ये राष्ट्रीय क्रीडा दिन उत्साहात साजरा करण्यात आला. हॉकीचे महान खेळाडू मेजर ध्यानचंद यांच्या जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी विविध क्रीडा प्रकारांची प्रात्यक्षिके सादर केली.

मेजर ध्यानचंद यांच्या प्रतिमेचे पूजन संस्थेचे सचिव अजित वडगावकर, संस्थेचे खजिनदार डॉ. दीपक पाटील, संस्थेचे विश्वस्त लक्ष्मण घुंडरे, विद्यालयाच्या पर्यवेक्षिका अनिता पडळकर आणि प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक प्रदीप काळे यांच्या हस्ते करण्यात आले.यावेळी अजित वडगावकर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना खेळामुळे व्यक्तिमत्त्व विकास, शिस्त, आत्मविश्वास आणि उत्तम आरोग्याला चालना मिळते, असे सांगितले. मेजर ध्यानचंद यांचा संघर्ष, जिद्द आणि क्रीडाक्षेत्रातील योगदान विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी असल्याचे त्यांनी नमूद केले.

क्रीडा विभागप्रमुख श्रीरंग पवार यांनी मेजर ध्यानचंद यांच्या जीवनकार्याची माहिती देत नियमित व्यायाम व क्रीडा सहभागाचे महत्त्व स्पष्ट केले. विद्यार्थ्यांनी खो-खो, डॉजबॉल, १०० मीटर धावणे, गोळाफेक आदी क्रीडा प्रकारांची प्रात्यक्षिके सादर केली.

## काळूबाई मंदिराचा कलशारोहण सोहळा उत्साहात

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**वीर :** पुरंदर तालुक्यातील श्री क्षेत्र वीर येथील नाथ म्हस्कोबा मंदिर परिसरात नव्याने उभारण्यात आलेल्या काळूबाई देवी मंदिराचा कलशारोहण सोहळा भक्तिमय वातावरणात उत्साहात संपन्न झाला. पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांच्या इंदूर घराण्यातील वंशज भुषणसिंह होळकर यांच्या हस्ते कलशारोहण करण्यात आले. मुख्य कार्यक्रमापूर्वी मंदिर परिसरात होम, हवन, यज्ञ, कलशपूजन आदी धार्मिक विधी पार पडले. सोहळ्याच्या पूर्वसंध्येला ढोल-ताशा, संबळ, सनई आदी वाद्यांच्या गजरात तसेच 'नाथ साहेबांचं चांगभलं' आणि 'काळूबाईच्या नावानं चांगभलं'च्या जयघोषात कलशाची ग्रामप्रदक्षिणा काढून भव्य मिरवणूक काढण्यात आली. मिरवणूक मंदिराच्या दक्षिण दरवाजातून मंदिर परिसरात दाखल झाल्यानंतर कलशाचा धान्याधिवास व अन्य धार्मिक विधी करण्यात आले. या सोहळ्यास देवस्थानचे विश्वस्त, मानकरी, दागिनदार, सल्लागार मंडळाचे सदस्य, ग्रामस्थ व भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते. वाघ परिवाराच्या वतीने भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. देवस्थानच्या वतीने फुलांची आकर्षक सजावट, विद्युत रोषणाई व भव्य मंडपाची व्यवस्था करण्यात आली होती, अशी माहिती देवस्थानचे मुख्य विश्वस्त मोहन धुमाळ यांनी दिली.

या कार्यक्रमात सल्लागार मंडळाचे रामभाऊ धुमाळ, तानाजी धुमाळ, बाळासाहेब धुमाळ यांच्यासह सर्व विश्वस्त, मानकरी, ग्रामस्थ व भाविकांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. श्रावण महिन्यातील या धार्मिक सोहळ्यामुळे संपूर्ण वीर परिसर भक्तिमय वातावरणाने भारावून गेला होता.

# मिश्र शेती पद्धत बळीराजासाठी ठरतेय वरदान

नवनाथ फलके । राष्ट्र सह्याद्री

**डिंभे :** बदलते हवामान, दुष्काळ, अतिवृष्टी, उत्पादन खर्चातील वाढ आणि पिकांना मिळणारा अनिश्चित बाजारभाव यामुळे शेतकरी सातत्याने संकटांचा सामना करत आहे. अशा परिस्थितीत एकाच पिकावर अवलंबून न राहता मिश्र शेती पद्धतीचा अवलंब, सुधारित वाणांची निवड, ठिबक सिंचन आणि सेंद्रिय शेतीची जोड देऊन उत्पादन व उत्पन्न वाढविण्याचा मार्ग आंबेगाव तालुक्यातील शेतकरी स्वीकारताना दिसत आहेत.

आंबेगाव तालुक्याचा पश्चिम भाग भातशेती, पूर्व भाग ऊसशेती, तर सातगाव पठार बटाटा उत्पादनासाठी ओळखला जातो. मात्र बदलत्या परिस्थितीत अनेक शेतकरी पारंपरिक पिकांसोबत फळबाग, भाजीपाला आणि विविध हंगामी पिकांची लागवड करू लागले आहेत. कांदा, बटाटा, फ्लॉवर, मिरची, बीट, टोमॅटो यांसारख्या पिकांची लागवड करून वर्षातून दोन ते तीन पिके घेण्याचा प्रयत्न केला जात आहे.



आमोंडी येथील शेतकरी निलेश काळे यांनी मिश्र शेती पद्धतीचा अवलंब करून ठिबक सिंचन व सुधारित वाणांच्या साहाय्याने घेतलेले मिरची व टोमॅटोचे भरघोस उत्पादन.

हुतात्मा बाबू गेनू जलाशय अर्थात डिंभे धरणामुळे आंबेगाव तालुक्याच्या पूर्व भागातील शेतीला मोठा आधार मिळाला आहे. घोड नदीमुळे उपलब्ध झालेल्या पाण्याचा फायदा घेत या भागात मोठ्या प्रमाणात ऊसशेती वाढली. मात्र सतत एकच पीक घेतल्याने जमिनीची उत्पादनक्षमता घटणे, मजुरांची कमतरता आणि ऊस वेळेत न तुटल्याने होणारे नुकसान यामुळे शेतकऱ्यांना पर्यायी शेती पद्धतींचा विचार करावा लागत आहे.

मिश्र शेतीमध्ये पिकांसोबत दुग्ध व्यवसाय, कुक्कुटपालन, शेळीपालन व मत्स्यपालन यांसारखे जोडधंदे केल्यास उत्पन्नाचे विविध स्रोत निर्माण होऊ शकतात. दुग्ध व्यवसायातून उपलब्ध होणाऱ्या शेणखताचा वापर सेंद्रिय शेतीसाठी करता येतो. तसेच गांडूळखत निर्मितीमुळे शेतीचा खर्च कमी करून अतिरिक्त उत्पन्न मिळविण्याची संधी निर्माण होते. माजी सरपंच, आमोंडी, निलेश काळे म्हणाले, शाश्वत शेतीसाठी सेंद्रिय शेती आणि मिश्र शेतीची सांगड घालणे आवश्यक आहे. ठिबक सिंचन, सुधारित वाणांची निवड आणि योग्य नियोजन केल्यास निसर्गाच्या संकटांचा सामना करून उत्पादन वाढविता येते.शेतकरी, आमोंडी, राजेंद्र फलके यांनी सांगितले की, अनेक वर्षे ऊसशेती केली; मात्र मजुरांच्या कमतरतेमुळे वेळेवर ऊसतोड होत नव्हती. त्यामुळे उत्पादन आणि नफा कमी होत होता. मिश्र शेतीकडे वळल्यानंतर विविध पिकांमधून चांगले उत्पन्न मिळू लागले.शेतकरी, ओंकार वायकर यांनीही पारंपरिक द्राक्षशेतीत हवामान बदल, जमिनीतील पोषक घटकांची कमतरता आणि वाढता खर्च यामुळे उत्पादन घटल्याचे सांगितले. त्यानंतर मिश्र शेतीसोबत दुग्ध व्यवसाय व शेळीपालन सुरू केल्याने उत्पन्नाचे प्रमाण वाढल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

एका पिकाला बाजारभाव मिळाला नाही किंवा नैसर्गिक संकटामुळे उत्पादन घटले, तरी दुसऱ्या पिकातून मिळणारे उत्पन्न शेतकऱ्याला आधार देऊ शकते. त्यामुळे आधुनिक तंत्रज्ञान, सुधारित वाण, ठिबक सिंचन आणि पूरक व्यवसायांची सांगड घालणारी मिश्र शेती पद्धत ही बदलत्या काळात बळीराजासाठी आर्थिक स्थैर्य देणारी ठरत आहे.

# द•ख•ल

## चिचोंडीत पविते अर्पण पर्व उत्साहात



**चिचोंडी पाटील :** येथील श्रीकृष्ण मंदिरात नारळी पौर्णिमेच्या पूर्व संधेस पविते अर्पण सोहळा उत्साहात सुरू झाला. पविते पर्व कालावधीत महानुभाव पंथिय अनुयायी रक्षाबंधनच्या पूर्व संधेस पविते रूपी राखी ईश्वरास अर्पण करण्याची परंपरा आहे. भक्तगण श्रीफळ, सुपाऱ्या व धागा, सुत अथवा लोकर इत्यादि साहित्याचा उपयोग करून पविते तयार करतात. जाळीचा देव येथील परमपुज्य महंत चिचोंडीकर बाबा यांच्या मार्गदर्शनात चिचोंडी येथील मंदिरात या पविते अर्पण सोहळा प्रारंभ झाला . अशी माहिती श्रीकृष्ण मंदिर देवस्थानचे पुजारी हरिभाऊ वसंत ठोंबरे यांनी दिली. मंदिर देवस्थानचे पूजारी चिचोंडीकर परिवाराच्या आणि भाविकांच्या उपस्थितीत रात्री पूजाअवसर संपन्न झाला. या वेळी पूजारी हरिभाऊ ठोंबरे, लक्ष्मीकांत ठोंबरे, रमेश ठोंबरे, संजय ठोंबरे, चक्रपाणि ठोंबरे , जयकुमार ठोंबरे, राजेंद्र ठोंबरे, जाळीचा देव येथील पुजारी सुजित उदरभरे, संतोष औटी, सुनिल शिंदे, सुलोचना ठोंबरे , घोगरगावच्या पुजारी पुष्पा कारंजकर, उषा ठोंबरे , अलका ठोंबरे, शैला ठोंबरे, भाग्यश्री ठोंबरे, प्रगती ठोंबरे, मोहिनी ठोंबरे, माधुरी उदरभरे, मालन कोकाटे, मिना औटी, साक्षी ठोंबरे, धनश्री ठोंबरे ,ऋषिकेश ठोंबरे, शुभम ठोंबरे, सुदर्शन ठोंबरे, आनंद ठोंबरे, निखिल ठोंबरे, सुयश ठोंबरे, तेजस ठोबरे, अभिषेक औटी, अनिकेत औटी, गणेश औटी, प्रिया शिंदे, सुप्रिया शिंदे आदी भाविक उपस्थित होते.

## भाविनिमगाव शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्षपदी पुजा चेडे

**दहिगाव ने :** शेवगाव तालुक्यातील भाविनिमगाव येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेची आगामी दोन वर्षांसाठी शालेय व्यवस्थापन समितीचे पुनर्गठन करण्यात आले आहे. शाळेचे मुख्याध्यापक सुभाष शेटे यांनी बोलावलेल्या पालक - शिक्षक सह विचार सभेतुन इच्छुक पालकांनमधुन सदस्य मंडळाची बिनविरोध निवड करण्यात आली. १ ली ते ७ वी इयत्तेतील सर्व वर्गांना प्रतिनिधित्व देण्यात आले असून नियमानुसार व लोकशाही मार्गाने निवडी करण्यात आल्या असल्याचे मुख्याध्यापक सुभाष शेटे यांनी सांगितले. राहुल झुंबर चव्हाण, शुभांगी मिनीनाथ थोरात, शिवप्रसाद भास्कर काळे, पूजा सोपान गायधने, णेश विष्णू शेळके, वैभव मच्छिंद्र मरकड,सोनाली श्रीराम ओहळे, संदीप भाऊसाहेब काळे, दिपाली उत्तम शिरसाठ, सोनाली ज्ञानेश्वर शिंदे, इमाम बन्सी शेख, मनेश माणिक काळे, विक्रम कडुबाळ घोडके आणि राणी संतोष म्हस्के आदींचा समावेश आहे. मुख्याध्यापक सुभाष शेटे यांच्या नियोजनात पुनर्गठन झालेल्या या समिती निवड प्रक्रियेत शिक्षक राजेंद्र पवार, निलेश गोरे, संगिता डोळे, विद्या भुसारी , अर्चना दहिफळे, जयश्री बोरगावकर, शैला नरवडे आदींनी सक्रिय सहभाग घेत सहकार्य केले. नुतन पदाधिकारी यांचे अभिनंदन केले जाते आहे.

## शिराळा येथे किर्तन सेवा व ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण

**शिराळ चिचोंडी :** पाथर्डी तालुक्यातील शिराळा येथील दि. ३० पासून अखंड हरिनाम सप्ताह देवगड येथील ह भ प भास्करगिरीजी महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली व झाडे महाराज व तनपुरे महाराज यांच्या अधिपत्याखाली शिराळ येथेसात दिवसमोफत कीर्तनरुपी निष्काम सेवादेण्यात येणार आहे शिराळ हे गाव भास्करगिरी महाराजांच्या कृपाशीर्वादाने येथे कीर्तनरुपी सेवा होणार आहे कोणत्याही महाराजांना देणगी न देता ते किर्तन सेवा करणार आहेत तसेच दिनांक सहा रोजी सकाळी दहा ते बारा या वेळेत ह भ प वेदांताचार्य देविदास महाराज मस्के ज्ञानेश्वर माऊली संस्थान नेवासा यांची काल्याचे किर्तन होईल व त्यानंतर महाप्रसाद भाविकांना वाटप करण्यात येईल. विठ्ठल रुक्मिणी मंदिर शिराळ तालुका पाथर्डीयेथे भव्य दिव्य हा सप्ताह होत असून गावातील सर्व ग्रामस्थ महाराज मंडळी तरुण मंडळ सहकार्य करणार आहेत तरी परिसरातील सर्व भाविक भक्तांनी या निष्काम कीर्तन सेवेचा लाभ घ्यावा व असा आदर्शशिराळ गावाचा घ्यावा निष्काम सेवा करावीअसे आव्हान ग्रामस्थ मंडळीने केले आहे.



## जिद्द मनात ठेवल्यामुळे यशस्वी झालो : निलेश ढाकणे

**हातगाव :** सार्वजनिक जीवनात जीवन जगत असताना प्रत्येक व्यक्ती वेग - वेगळ्या माध्यमातून जीवन जगत असतो मात्र जीवनात आपण काही तरी करून दाखवू असा समज मनात ठेऊन ज्या बाबी साध्य करायच्या आहेत.त्या पूर्णत्वाकडे नेण्यासाठी मनात खूण - गाठ बांधणारा व्यक्ती निश्चित यशस्वी होतो असे मत शेवगाव तालुक्यांतील हातगाव येथील निलेश बाबासाहेब ढाकणे या तरुणाने व्यक्त केले आहे. धुळे जिल्ह्यात निलेश ढाकणे या तरुणाची नुकतीच जिल्हा परिषदेच्या शाळेत शिक्षक सेवक म्हणून निवड झाली असल्यामुळे ग्रामस्थांतर्फे ढाकणे यांचा सन्मान करण्यात आला असून त्या प्रसंगी सत्काराला उत्तर देताना ढाकणेनी आपले विचार व्यक्त केले आहे. शिक्षण हे प्रत्येक व्यक्तीने घेतलेच पाहिजे कारण ते शिक्षण प्रत्येकाच्या आयुष्याला आधारभूत किंमत देत असून प्रापंचिक दृष्ट्या शिक्षणाला महत्वाचे स्थान देणाऱ्याला दिशादर्शक मार्ग प्राप्त झाल्याशिवाय राहत नाही असेही ढाकणे यांनी या वेळी सांगितले आहे. या वेळी बद्रीनाथ बर्गे, संजय गलांडे यांनीही आपले विचार व्यक्त करून ढाकणेंना पुढील आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.या वेळी सरपंच प्रशासक अरुण मातंग, दत्ता वि.भराट, दिलीप आंबेकर, गोरख कदम,शंकर भराट,एकनाथ सुसे, प्रशांत ढाकणे ,बाळासाहेब सुसे, पत्रकार रावसाहेब निकाळजे,कृषी सहाय्यक सुभाष बारगजे यांच्यासह असंख्य ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.तर जय मल्हार तरुण मंडळाच्या वतीनेही खंडोबा मंदिरात ढाकणेचा सत्कार करण्यात आला असून या वेळी संतोष गुंजाळ,विनोद निर्मळ, लहू गुंजाळ,नितीन निर्मळ,मिठू भिसे,अमोल जऱ्हाड यांच्यासह इतरही युवक उपस्थित होते.

# ‘पवित्र पोर्टल’ प्रक्रियेद्वारे वासुंदे गावच्या ९ शिक्षकांची निवड

## शिक्षक निवडणारे वासुंदे हे राज्यातील पहिले गाव : झावरे

गंगाधर धावडे । राष्ट्र सह्याद्री

**टाकळी ढोकेश्वर : एकाच वेळी एकाच गावातून तब्बल ९ तरुणांची राज्याच्या 'पवित्र पोर्टल' प्रक्रियेद्वारे शिक्षक पदावर निवड होण्याचा अभूतपूर्व विक्रम वासुंदे गावाने रचला आहे. एकाच भरती प्रक्रियेत नऊ शिक्षक देणारे वासुंदे हे राज्यातील पहिले गाव ठरले आहे. वासुंदे गावातील निलेश भालके,कुमार रोहोकले, अंकुश झावरे, वैष्णवी दादासाहेब रोकडे, आविष्कार बर्वे, सत्यवान झावरे, स्नेहल शिवाजी बर्वे, श्वेता शिवाजी बर्वे, पायल पांडुरंग ढेंबरे यांची पवित्र पोर्टल मधून निवड झाली आहे.**



या यशाबद्दल वासुंदे गावच्या वतीने सुजित झावरे पाटील यांच्या हस्ते सर्व नवनिर्वाचित शिक्षकांचा शाल, श्रीफळ व सन्मानचिन्ह देऊन सन्मान करण्यात आला.

यावेळी बोलताना सुजित झावरे पाटील म्हणाले, की पारनेर तालुका हा राज्याला शिक्षक पुरवणारा तालुका आणि शिक्षकांची पंढरी म्हणून ओळखला जातो वासुंदे, कान्हुर पठार, टाकळी ढोकेश्वर, गोरेगाव, भोंद्रे, गारगुंडी या गावांमध्ये घराघरांमध्ये शिक्षक आहेत.

आजचा दिवस शैक्षणिक आणि सामाजिक इतिहासात वासुंदे गावाचे नाव सुवर्णअक्षरांनी कोरणारा ठरला आहे. एकाच वेळी ९ मुलांची पवित्र पोर्टलच्या अत्यंत कठीण प्रक्रियेतून शिक्षक म्हणून निवड होणे ही आपल्या सर्वांसाठी अत्यंत अभिमानाची आणि शिरपेचात तुरा रोवणारी बाब आहे.हे यश या मुलांच्या जिद्दीचे,मेहनतीचे आणि पालकांच्या त्यागाचे फलित आहे. शिक्षक हे केवळ नोकरीचे साधन नसून ते राष्ट्र उभारणीचे मुख्य शिल्पकार आहेत. ज्या शाळांमध्ये रुजू व्हाल,तिथे विद्यार्थ्यांमध्ये ज्ञानाची ज्योत तेवत ठेवून त्यांच्यावर उत्तम संस्कार करा. वासुंदे गावाच्या यशाने राज्यातील इतर ग्रामीण भागातील तरुणांनाही नवी दिशा आणि प्रेरणा दिली आहे.

यावेळी ग्रामस्थांच्या वतीने नवनिर्वाचित शिक्षकांवर अभिनंदनाचा वर्षाव करण्यात आला.नवनिर्वाचित शिक्षकांनीही आपल्या भावना व्यक्त करताना गावाविषयी कृतज्ञता मानली.

यावेळी सरपंच विमल झावरे,शरदराव पाटील, पोपटराव झावरे,उपसरपंच बाळासाहेब शिंदे,विविध कार्यकारी सेवा संस्थेचे चेअरमन,व्हाईस चेअरमन,सर्व ग्रामपंचायत सदस्य, सोसायटी संचालक, भागातील मान्यवर मंडळी व ग्रामस्थ उपस्थित होते.

# एकल महिलांच्या प्रश्नांसाठी दर महिन्याला ‘महिला दरबार’ : सोनाली सालके

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**निघोज :** एकल महिला, घटस्फोटित,परित्यक्ता तसेच इतर एकल महिलांच्या विविध समस्या सोडविण्यासाठी दर महिन्याच्या एका सोमवारी ‘महिला दरबार’ आयोजित करण्यात येणार आहे.या माध्यमातून महिलांचे प्रश्न थेट जाणून घेऊन संबंधित शासकीय विभागांकडे पाठपुरावा करून पात्र महिलांची प्रलंबित प्रकरणे मार्गी लावणार आसे प्रतिपादन भाजप महिला आघाडीच्या तालुकाध्यक्ष सोनाली सालके यांनी केले.



पारनेर शहरातील पंचायत समिती सभागृहात एकल महिला प्रशिक्षण व सर्वेक्षण कार्यक्रमात महिलांनी आपल्या विविध समस्या सालके यांच्यासमोर मांडल्या. कार्यक्रमास एकल महिला समितीचे राज्याध्यक्ष हेरंब कुलकर्णी,पारनेर तालुका अभियान व्यवस्थापक रमेश बारगुजे,स्वप्नाली तोडमल, भारती खुपते,सचिन हाडोळे,सीआरपी,एकल महिला समितीच्या पदाधिकारी उपस्थित होते.

संजय गांधी निराधार योजनेसह विविध शासकीय योजनांची माहिती,अर्ज प्रक्रिया आणि आवश्यक कागदपत्रांबाबत मार्गदर्शन मिळत नसल्याने अनेक पात्र महिला योजनांपासून वंचित राहत असल्याचे महिलांनी सांगितले. काही ठिकाणी शासकीय प्रकरणे मंजूर करून देण्याच्या नावाखाली पैशांची मागणी केली जात असल्याच्या तक्रारीही महिलांनी मांडल्या.

सालके म्हणाल्या,एकल महिला ही दयेची नाही, तर हक्काची आणि स्वाभिमानाची व्यक्ती आहे. शासकीय योजनांचा लाभ मिळविण्यासाठी तिला कोणासमोरही विनवणी करण्याची वेळ येऊ नये.

# स्नेहप्रेमच्या विद्यार्थ्यांनी दिला महिला सन्मानाचा संदेश

## जनजागृती करणारे फलक हाती घेऊन समाजप्रबोधन

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**कर्जत :** रक्षाबंधन सणालाच फक्त महिला सन्मान किंवा त्यांच्या संरक्षण करण्याची हमी आपल्या बहिणींना देऊ नका. या उलट हातावर राखी बांधल्यावर आपल्या स्वताच्या बहिणीसह समाजातील इतर महिला-भगिनींची देखील मी रक्षा करीन. तिची कसलीही छेडछाड करणार नाही किंवा जेथे कुठे चुकीचे वर्तन होत असेल त्यास भाऊ म्हणून विरोधच करेन ही ओवाळणी टाका. असा सामाजिक संदेश कर्जतच्या स्नेहप्रेम संस्थेच्या मुलांनी फलक हाती घेत शुक्रवारी रक्षाबंधनाच्या दिवशी शहरातील बाजारपेठेत दिला.




शुक्रवारी बहिण- भावाच्या प्रेमाच प्रतीक असणारा रक्षाबंधन सण सर्वत्र मोठ्या उत्साहात साजरा झाला. या सणास बहीण आपल्या भावाच्या हातावर राखी बांधत तिच्या रक्षणाची हमी घेते. हाच धागा पकडून कर्जत स्नेहप्रेम संस्थेच्या विद्यार्थ्यांनी सध्याच्या घडीला विकृत मानसिकतेने महिला-मुलींची होणारी छेडछाड, अत्याचाराचे वाढते प्रमाण यात पुरुषी विकृत प्रकाराने समाजात महिलांमध्ये असुरक्षिततेची जाणिव आणि भयभीत परिस्थिती निर्माण झाली. यावर लाडक्या भाऊरायाचे समुपदेशन व्हावे तसेच समाजात जनजागृती व्हावी या अनुषंगाने शुक्रवारी कर्जतच्या बाजारपेठेत या विद्यार्थ्यांनी हाती संदेश फलक घेत त्यावर वाईट नजर ही वाईट विचारांमुळे पडते. अन्यथा शरीर रचना तर आपल्या बहिणीची पण तशीच आहे. त्यामुळे चांगले विचार अंगिकारा... महिला-मुलींची इज्जत करा. हे यासाठी करू नका की, ती महिला आहे. ती यासाठी करा की आपल्यावर आपल्या माता-पित्यांचे चांगले संस्कार घडले आहेत. महिलांना वाईट नजरेने निरखून पाहत राहणाऱ्यानो, देव तुम्हाला पण अतिसुंदर कन्या रत्न देवो या आशयाचे मनाला स्पर्श करणाऱ्या संदेशाने पुरुषी तरुणाईस हात घातला.

# शेवगाव तालुक्यात पावसाची दडी

## खरीप पिके धोक्यात

सुरेश पाटील । राष्ट्र सह्याद्री

**अमरापुर :** तालुक्यात ऑगस्ट महिना सरत आला तरी अद्याप समाधानकारक पाऊस झालेला नाही. गेल्या महिनाभरापासून पावसाने उघडीप दिल्याने खरीप पिकांना मोठा फटका बसला आहे. अनेक ठिकाणी पिकांची वाढ खुंटली असून, पिके वाळू लागल्याचे चित्र आहे. पेरणी, बियाणे, खते, औषध फवारणी व मजुरी यावर मोठा खर्च करूनही उत्पादनाची अपेक्षा मावळू लागल्याने शेतकरी आर्थिक अडचणीत सापडला आहे. पावसाळा सुरू झाल्यापासून जोरदार पावसाची अपेक्षा असतानाच हिरावली गेली. नदी-नाल्यांना पाण्याची आस लागली असून, विहिरी व बोअर कोरडे पडण्याची परिस्थिती निर्माण झाली आहे. परिणामी बागायती क्षेत्रालाही मोठा फटका बसत आहे. हजारो हेक्टरवरील उसासह खरीप पिकांची अवस्था बिकट होत चालली आहे. फुट-दोन फुट वाढलेल्या कपाशीच्या




पिकाला फूल लागण्यास सुरुवात झाली असली तरी पाण्याअभावी त्याची वाढ खुंटण्याची भीती निर्माण झाली आहे. बाजरी, कणीस, तूर, भुईमूग आदी पिकांची अवस्था अपेक्षेप्रमाणे झालेली नाही. त्यातच जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न गंभीर झाला असून, शेतकऱ्यांची झोप उडाली आहे. सूर्यप्रकाशित वातावरण आणि दररोज सुटणाऱ्या वाऱ्यामुळे जमिनीतील ओलावा झपाट्याने कमी होत आहे. शेतकऱ्यांच्या अंगाला आता पिकांच्या विनाशाचे वारे जाणवू लागले आहेत. दरम्यान, रानावनात वस्तीवर राहत असलेल्या शेतकऱ्यांना शेतीबरोबरच पिण्याच्या पाण्याचे संकटही भेडसावत आहे.

# नांदूर पठारला राजदेव यांचा अनोखा रक्षाबंधन सोहळा

## शेकडो भगिनींनी बांधल्या राख्या; खा. लंके यांची प्रमुख उपस्थिती

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**निघोज :** रक्षाबंधनाचा सण भाऊ-बहिणीच्या प्रेम, जिव्हाळा आणि विश्वासाचे नाते अधिक दृढ करणारा सण म्हणून साजरा केला जातो. याच भावनेतून नांदूर पठारचे माजी सरपंच तथा निलेश लंके प्रतिष्ठानचे उपाध्यक्ष रविंद्र राजदेव यांच्या पुढाकारातून शुक्रवार, दि. २८ ऑगस्ट रोजी नांदूर पठार येथे अनोख्या सार्वजनिक रक्षाबंधन सोहळ्याचे आयोजन खासदार निलेश लंके यांच्या उपस्थितीत करण्यात आले. गावातील तसेच लग्न होऊन गावाबाहेर गेलेल्या शेकडो भगिनी या सोहळ्यास उपस्थित राहिल्याने संपूर्ण परिसरात भावनिक व उत्साहपूर्ण वातावरण निर्माण झाले होते.

सकाळपासून सभागृहात भगिनींची मोठी गर्दी झाली होती. उपस्थित शेकडो भगिनींनी खासदार निलेश लंके व रविंद्र राजदेव यांना राखी बांधून भाऊ-बहिणीच्या नात्याचा स्नेह जपला. प्रत्येक भगिनीने राखी बांधताना व्यक्त केलेली आपुलकी आणि राजदेव यांनी प्रत्येक बहिणीचे केलेले प्रेमळ स्वागत यामुळे कार्यक्रमाला कौटुंबिक स्वरूप प्राप्त झाले. राख्यांनी सजलेले राजदेव यांचे मनगट हा या सोहळ्याचा विशेष भावनिक क्षण ठरला.



रक्षाबंधनानिमित्त बहिणींना भेटवस्तू देण्यापेक्षा त्यांच्या हाताला व्यवसायाचे बळ देणे, हे माझ्यासाठी खरे गिफ्ट आहे. महिलांनी स्वतःच्या पायावर उभे राहावे, यासाठी मतदारसंघात ‘महिला उद्योजक मेळावा’ आयोजित केला आहे. व्यवसाय, प्रशिक्षण, शासकीय योजना, कर्ज व सबसिडीबाबत मार्गदर्शन मिळणार आहे. या संधीचा लाभ घेऊन महिलांनी स्वावलंबी व्हावे, हीच माझी इच्छा आहे.

रक्षाबंधनानिमित्त उपस्थित प्रत्येक भगिनीला राजदेव यांच्या वतीने प्रेमाची भेटवस्तू आणि अल्पोपहार देण्यात आला.

रविंद्र राजदेव हे सामाजिक कार्यात सक्रिय असून, गावकऱ्यांच्या विविध प्रश्नांसाठी त्यांनी सातत्याने पाठपुरावा केला आहे. महसूल विभागातील त्रुटी, शासकीय दाखले, वृद्धांचे मानधन तसेच नागरिकांच्या विविध शासकीय कामांसाठी शिबिरे व आंदोलने आयोजित करून त्यांनी सामाजिक कार्याचा ठसा उमटविला आहे. त्यामुळे या रक्षाबंधन सोहळ्याकडे त्यांच्या माणूसकेंद्री कार्यशैलीचा एक भाग म्हणून पाहिले जात आहे.

यावेळीराष्ट्रवादीच्याटाकळी ढोकेश्वर गटाच्या महिला नेत्या सोनियाताई राजदेव, निलेश लंके प्रतिष्ठानचे पोपटराव गुंड, खंडोबा देवस्थानचे चंद्रभान ठुबे, राष्ट्रवादीचे नेते सुभाष शिंदे, नवनाथ घोलप, माजी सरपंच हरीभाऊ आहेर, माजी सरपंच भानुदास आग्रे, माजी उपसरपंच हरिभाऊ देशमाने, तंटामुक्ती अध्यक्ष दत्ता चौधरी, र नवनाथ गांजे, शैला आंधळे यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

# श्री जगदंबा देवस्थानच्या शेत जमिनीवर मुरूम तस्करांचा डल्ला!

## ‘मुरूम चोरांचा शोध घ्या, जेसीबी-पोकलेन-डंपर जप्त करा’; आरपीआयचे रवींद्र दामोदरे आक्रमक

ऋषभ परदेशी। राष्ट्र सह्याद्री

**राशीन :** मौजे राशीन, ता. कर्जत येथील श्री जगदंबा देवी देवस्थानच्या इनामी वर्ग-३ जमिनीतील गट क्रमांक १४५८/१ मधून मुरूमाचे अवैध उत्खनन करून वाहतूक केल्याची तक्रार समोर आल्यानंतर महसूल प्रशासनाने अखेर दखल घेतली आहे. दि. २७ ऑगस्ट २०२६ रोजी महसूल विभागाने घटनास्थळी प्रत्यक्ष पाहणी करून पंचनामा केला असून, देवस्थानच्या शेतजमिनीत चार ठिकाणी उत्खननाच्या खुणा आढळल्याची नोंद करण्यात आली आहे.

राशीनचे मंडळाधिकारी विश्वास राठोड, तलाठी तसेच महसूल विभागातील अधिकारी-कर्मचाऱ्यांनी घटनास्थळी पाहणी केली. पाहणीदरम्यान गट क्रमांक १४५८/१ मधील मुरूमाच्या टेकडीमध्ये उत्खनन झाल्याचे तसेच काही ठिकाणी मोठे खड्डे पडल्याचे पंचनाम्यात नमूद करण्यात आले आहे.

रात्रीच्या अंधारात जेसीबी-पोकलेनचा वापर?

श्री जगदंबा देवी देवस्थानचे पुजारी तक्रारदार सुनील देविदास रेणुकर (वय ५९) यांनी महसूल विभागासमोर दिलेल्या जबाबात, रात्रीच्या अंधाराचा फायदा घेत अज्ञात व्यक्तींकडून जेसीबी, पोकलेन आदी यंत्रांच्या साहाय्याने मुरूम उत्खनन व वाहतूक केली जात असल्याचे नमूद केले आहे. याबाबत राशीन पोलीस ठाण्यात तक्रार करण्यात आल्याचेही त्यांनी



सांगितले तसेच रात्री अपरात्री पोलीस प्रशासनाने त्या ठिकाणी फेरी मारली पाहिजे.

मात्र, महसूल विभागाच्या पाहणीवेळी घटनास्थळी कोणतेही वाहन, जेसीबी, पोकलेन किंवा संशयित व्यक्ती आढळून आली नसल्याची नोंद पंचनाम्यात आहे. त्यामुळे मुरूम नेमका कोणी काढला, कोणत्या वाहनांनी वाहतूक केली आणि या प्रकारामागे कोण आहे, याचा छडा लावण्याचे आव्हान आता पोलिसांसमोर आहे.

चार ठिकाणी उत्खननाच्या खुणा; मोजमाप धक्कादायक!, मात्र, हे प्राथमिक मोजमाप असून अचूक क्षेत्रफळ आणि मुरूमाचे नेमके प्रमाण ईटीएसद्वारे मोजमाप केल्यानंतरच स्पष्ट होणार आहे. त्यामुळे आता ईटीएस मोजमापाकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

दरम्यान, रवींद्र दामोदरे तसेच पत्रकार अनिल लष्करे यांनी मुरूम उत्खननाच्या मुद्द्यावर राशीन ग्रामपंचायतीच्या ग्रामसभेत आवाज उठवला. त्यानंतर त्यांनी घटनास्थळी जाऊन देवस्थानच्या शेतजमिनीची पाहणी केली आणि सोशल मीडियाच्या माध्यमातून दामोदर यांनी प्रशासनाकडे आक्रमक भूमिका मांडली.

मुरूम उत्खनन करणाऱ्यांचा शोध घेऊन त्यांच्यावर दंडात्मक कारवाई झाली पाहिजे. व हा मुरूम उचलून कुठे नेला कुठे टाकण्यात आला याचाही तपास महसूल पोलीस यंत्रणेने करावा या प्रकरणात वापरण्यात आलेली जेसीबी, पोकलेन, डंपर, ट्रॅक्टर व इतर यंत्रसामग्री शोधून पोलिसांनी जप्त करावी. या प्रकरणाचा छडा लावून दोषींवर कठोर कारवाई झाली पाहिजे, मकोका व तडीपार करण्याची मागणी दामोदरे यांनी केली.

तसेच येत्या सात दिवसांत मुरूम उत्खनन करणाऱ्यांचा शोध लागला नाही किंवा ठोस कारवाई झाली नाही, तर तहसीलदार व पोलिसांकडे तक्रार करून सर्व कागदपत्रे व उपलब्ध पुराव्यांसह जिल्हाधिकारी कार्यालयासमोर संपूर्ण लेखाजोखा मांडणार, असा इशाराही त्यांनी दिला. मुरूम उत्खनन करणाऱ्यांविरुद्ध फौजदारी स्वरूपाचे गुन्हे दाखल करण्याची मागणी करणार असल्याचे दामोदरे यांनी स्पष्ट केले.

‘देवस्थानची जमीन म्हणजे कुणाच्या बापाची मालमत्ता नाही!’

श्री जगदंबा देवी देवस्थानच्या जमिनीचा प्रश्न असल्याने या प्रकरणाकडे केवळ मुरूम उत्खनन म्हणून न पाहता देवस्थानच्या मालमत्तेच्या संरक्षणाचा गंभीर प्रश्न म्हणून प्रशासनाने पाहावे, अशी मागणी ग्रामस्थांमधून होत आहे. रात्रीच्या अंधाराचा फायदा घेत उत्खनन झाल्याची तक्रार खरी असेल, तर यामागे कोणाचा हात आहे. याचा तपास होणे गरजेचे आहे.

दैनिक
# राष्ट्र सह्याद्री




## बिबट्याच्या भीतीने शेततळ्यात पडून बालकाचा दुर्दैवी मृत्यू

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**झरेकाठी :** संगमनेर तालुक्यातील जवळे कडलग येथे बिबट्याच्या भीतीने पळताना शनिवारी शेततळ्यात पडून ११ वर्षीय कृष्णा वसंत पवार या बालकाचा बुडून दुर्दैवी मृत्यू झाल्याची हृदयद्रावक घटना घडली आहे. यापूर्वीही याच परिसरात बिबट्याच्या हल्लयात एका लहान मुलाला आपला जीव गमवावा लागला होता. या पार्श्वभूमीवर पुन्हा एकदा घडलेल्या या दुर्दैवी घटनेमुळे संपूर्ण परिसरात शोककळा पसरली. मुलाचा मृतदेह बाहेर काढण्यासाठी शिवछत्रपती इ आर टी टीमचे जवान नवनाथ सिनारे आणि प्रशांत पांडे यांनी तातडीने शोधमोहीम सुरू केली. सुमारे अर्धा तास अथक प्रयत्न केल्यानंतर दोन्ही जवानांना मृतदेह शोधण्यात यश आले आणि तो पाण्यातून बाहेर काढण्यात आला. त्यानंतर मृतदेह पुढील वैद्यकीय तपासणीसाठी संगमनेरच्या घुलेवाडी ग्रामीण रुग्णालयात पाठवण्यात आला आहे.




## समृद्धी महामार्गालगत गॅस पाइपलाइनला गळती; प्रशासनाची धावपळ

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**वैजापूर** : वैजापूर - समृद्धी महामार्गालगत माळीवाडा येथे गेल कंपनीच्या गॅस पाइपलाइनमधून गॅस गळती झाल्याची घटना शनिवारी सायंकाळी साडेसहा वाजेच्या सुमारास उघडकीस आली. वैजापूर तालुक्यातील हडस पिंपळगाव टोल नाका ते माळीवाडा टोल नाका दरम्यान चॅनेल क्रमांक ४५१ जवळ ही घटना घडली. गॅसगळतीची माहिती मिळताच प्रशासन व पोलिस यंत्रणा तातडीने घटनास्थळी दाखल झाली.





गॅसगळतीमुळे कोणताही अनुचित प्रकार घडू नये, यासाठी खबरदारीचा उपाय म्हणून समृद्धी महामार्गावरील वाहतूक तात्पुरती वळवण्यात आली आहे. छत्रपती संभाजीनगरच्या दिशेने जाणारी नागपूर कॉरिडॉरची वाहतूक हडसपिंपळगाव येथून जुन्या नागपूर-मुंबई महामार्गावरून वळवण्यात आली आहे. तसेच नागपूरहून मुंबईच्या दिशेने जाणारी वाहतूक सावंगी येथूनच वळवण्यात आली आहे. घटनेची माहिती मिळताच महामार्ग पोलीस, वैजापूर पोलीस तसेच संबंधित यंत्रणांनी घटनास्थळी धाव घेत परिस्थितीचा आढावा घेतला.

गॅसगळतीच्या ठिकाणी सुरक्षेच्या दृष्टीने आवश्यक उपाययोजना करण्यात येत असून, गॅसची गळती थांबवण्यासाठी प्रशासन व संबंधित कंपनीच्या पथकांकडून युद्धपातळीवर प्रयत्न सुरू आहेत. दरम्यान, वाहतूक सुरळीत करण्यासाठी पोलीस अधिकारी व कर्मचारी घटनास्थळी तैनात करण्यात आले आहेत.

हडस पिंपळगाव येथे प्रशिक्षणार्थी उपविभागीय अधिकारी विनय सोनवणे यांच्यासह नंदकिशोर नरोटे, ज्ञानेश्वर मेटे, किरण रावते आदी अधिकारी व कर्मचारी वाहतूक कोंडी होऊ नये यासाठी प्रयत्न करत आहेत.

गॅसगळती पूर्णपणे नियंत्रणात येईपर्यंत वाहनचालकांनी प्रशासनाने दिलेल्या पर्यायी मार्गाचा वापर करावा आणि घटनास्थळाच्या परिसरात अनावश्यक गर्दी करू नये, असे आवाहन करण्यात आले आहे.

## स्टेट बँकेच्या सीडीएममध्ये पैसे भरताना ७० हजारांना गंडा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी** : स्टेट बँक ऑफ इंडियाच्या सीडीएम मशिनमध्ये पैसे भरत असताना ग्राहकाला बोलण्यात गुंतवून त्याच्या खात्यातील ७० हजार रुपये लंपास केल्याची घटना राहुरी शहरात घडली. याप्रकरणी तीन अज्ञात भामट्यांविरुद्ध राहुरी पोलिस ठाण्यात फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

रविंद्र बाळासाहेब माने (वय ३९, रा. धामोरी बुद्रुक, ता. राहुरी) हे १९ ऑगस्ट रोजी दुपारी साडेएक वाजता राहुरी येथील स्टेट बँकेच्या सीडीएम केबिनमध्ये पैसे जमा करण्यासाठी गेले होते. सुरुवातीला त्यांनी ४९ हजार ५०० रुपये जमा केले. त्यानंतर त्यांनी ७० हजार रुपये मशिनमध्ये टाकले. मात्र त्यातील १० हजार रुपये परत आले. यावेळी तेथे उपस्थित असलेल्या तिघांपैकी एकाने माने यांना बोलण्यात गुंतवून, परत आलेले पैसे मशिनमध्ये जमा होणार नसल्याचे सांगितले. तसेच बाहेर सेवा केंद्रावर पैसे जमा करून देतो, असे सांगून त्यांना केबिनबाहेर नेले.

दरम्यान दुसरा भामटा सीडीएम मशिनजवळ गेला. यानंतर माने यांनी पुन्हा २० हजार २०० रुपये मशिनमध्ये जमा केले. अशा प्रकारे त्यांनी एकूण १ लाख ३९ हजार ७०० रुपये जमा केल्याचे त्यांच्या लक्षात होते. घरी गेल्यानंतर मोबाईलवर खात्याचा तपशील तपासला असता केवळ ६९ हजार ७०० रुपये जमा झाल्याचे दिसून आले. ७० हजार रुपये खात्यात जमा झाले नसल्याने त्यांनी बँकेत चौकशी केली. त्यानंतर फसवणूक झाल्याचे त्यांच्या लक्षात आले.

माने यांनी राहुरी पोलिसांत फिर्याद दिली. त्यानुसार तिघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून, पोलिस निरीक्षक रविंद्र देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील तपास सुरू आहे.

## नागरदेवळे शिवारात छापा

### सव्वा तीन लाखाचा गांजा जप्त : महिलेविरुद्ध गुन्हा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर** : नगर शहराजवळील नागरदेवळे गावच्या शिवारात एका शेतात बेकायदेशीरपणे गांजाची झाडे लावून त्याची लागवड व निर्मिती करणाऱ्या एका महिलेविरुद्ध भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

नागरदेवळे शिवारात पोलिसांनी टाकलेल्या छाप्यात ३ लाख १६ हजार ३०० रुपये किमतीचा ३१ किलो ६३ ग्रॅम वजनाची उग्र वासाची गांजाची झाडे जप्त करण्यात आली आहेत. याबाबत पोलीस सूत्रांकडून समजलेली सविस्तर माहिती अशी की, दि. २८ ऑगस्ट २०२६ रोजी सायंकाळी नागरदेवळे गावच्या शिवारातील अमरधाम लगत असलेल्या शेतात गांजाची लागवड करण्यात आली असल्याची माहिती भिंगार कॅम्प पोलीस ठाण्याच्या सहा. पो. नि. तेजश्री थोरात यांना मिळाली. त्या माहितीच्या आधारे पोलीस पथकाने घटनास्थळी जाऊन पाहणी केली असता तेथे गांजाची झाडे आढळून आली.

बुऱ्हानगर येथील एका महिलेने शासनाची कोणतीही परवानगी न घेता स्वतःच्या फायद्यासाठी बेकायदेशीरपणे गांजा या अमली पदार्थाची चोरटी विक्री करण्याच्या उद्देशाने गांजाच्या झाडांची लागवड करून त्याचे उत्पन्न घेतल्याचे समोर आले आहे.

याप्रकरणी भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात पो. कॉ. प्रमोद मधुकर लहारे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून संशयित महिलेविरुद्ध गुंगीकारक औषधी द्रव्य व मनोव्यापारावर परिणाम करणारे पदार्थ अधिनियम १९८५ चे कलम ८ (क), २० (अ) (ब) प्रमाणे गुन्हा नोंदविण्यात आला आहे. पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक तेजश्री थोरात या करीत आहेत.

## जामखेडमध्ये अवैध गुटखा विक्रीवर ‘एलसीबी’ची कारवाई

### नान्नज, कोल्हेवाडी परिसरात छापे

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**जामखेड** : अहिल्यानगर जिल्ह्याचे पोलिस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या सूचनेनुसार स्थानिक गुन्हे शाखेने अवैध धंद्यांविरोधातील मोहीम तीव्र केली आहे. त्याअंतर्गत जामखेड पोलिस ठाण्याच्या हद्दीतील नान्नज व कोल्हेवाडी परिसरात छापे टाकून अवैध गुटखा, सुगंधित तंबाखू व माव्याची विक्री करणाऱ्यांविरुद्ध कारवाई करण्यात आली.



या कारवाईत पाच स्वतंत्र गुन्हे दाखल करण्यात आले असून, सुमारे ९७ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक संतोष मुटकुळे यांच्या मार्गदर्शनाखाली पथकाने २८ ऑगस्ट रोजी ही कारवाई केली. नान्नज येथे गणेश शिवाजी गोरे (वय २८), विशाल शिवाजी वटाणे (२८), वृषभ राजेंद्र पोते (२४) आणि योगेश लक्ष्मण मोहोळकर (२४) यांच्याविरुद्ध स्वतंत्र गुन्हे दाखल करण्यात आले.

त्यांच्याकडून सुगंधित तंबाखू व मावा जप्त करण्यात आला. या प्रकरणातील मालपुरवठादार आप्पा कुमटकर (रा. राजेगाव, ता. जामखेड) फरार असल्याचे पोलिसांनी सांगितले.

कोल्हेवाडी येथे युवराज नारायण कोल्हे (वय ३८) याच्याकडून सुमारे ९७ हजार रुपयांचा अवैध गुटखा व पानमसाला जप्त करण्यात आला. या प्रकरणातील सचिन जाधव (रा. कडा, ता. आष्टी, जि. बीड) फरार आहे. जामखेड पोलिस ठाण्यात BNS कलम १२३, २२३, २७४, २७५ व ३(५) अन्वये गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. पोलिस निरीक्षक संतोष मुटकुळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस पथकाने ही कारवाई केली. या कारवाईमुळे अवैध व्यवसाय करणाऱ्यांमध्ये खळबळ उडाली आहे.

## अल्पवयीन मुलीचे अपहरण, गुन्हा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी :** बाथरुमला जाते असे सांगुन घराबाहेर गेलेल्या अल्पवयीन मुलीचे अपहरण करून तीला पळवून नेण्यात आले. ही घटना दि. २६ ऑगस्ट रोजी रात्रीच्या दरम्यान राहुरी तालुक्यातील बारागांव नांदुर परिसरात घडली. एक १६ वर्षीय अल्पवयीन मुलगी राहुरी तालुक्यातील बारागांव नांदुर परिसरात तीच्या कुटुंबासह राहते.

दि. २६ ऑगस्ट २०२६ रोजी रात्री ८ वाजे दरम्यान पिडीत मुलगी बाथरुमला जाते, असे सांगुन घराबाहेर गेली होती. ती बराच वेळ झाल्यानंतर परत आली नाही. तेव्हा नातेवाईकांनी पिडीत मुलीचा परिसरात शोध घेतला. मात्र ती कोठेही मिळुन आली नाही. तीला कोणीतरी अज्ञात इसमाने पळवुन नेले असावे, अशी नातेवाईकांची खात्री झाली. त्यानंतर पिडीत मुलीच्या आईने राहुरी पोलिस ठाण्यात फिर्याद दाखल केली.

त्यानुसार अज्ञात इसमावर गुन्हा दाखल करण्यात आला. पोलिस निरीक्षक रविंद्र देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस पथक पिडीत मुलीचा शोध घेत आहे.

## शनिशिंगणापुरात भाविकांच्या वाहनांना अडवून पूजा साहित्य खरेदीचा आग्रह

### दुकानदारांविरुद्ध गुन्हे दाखल

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**शनिशिंगणापूर** : शनिदर्शनासाठी शनिशिंगणापूर येथे आलेल्या भाविकांच्या वाहनांना अडवून विशिष्ट दुकानातूनच पूजा साहित्य खरेदी करण्यास प्रवृत्त केल्याप्रकरणी शनिशिंगणापूर पोलिसांनी दोन वेगवेगळ्या प्रकरणांत दोघांविरुद्ध गुन्हे दाखल केले आहेत.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, लक्ष्मण विष्णू अंभोरे (रा. शनिशिंगणापूर, ता. नेवासा) याच्याविरुद्ध गुन्हा रजि. क्र. १५०/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहितेच्या कलम १२६(२), २२३ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. भाविकांच्या वाहनास स्वतःची मोटारसायकल आडवी लावून त्यांना आपल्या दुकानातूनच पूजा साहित्य घेण्यास प्रवृत्त केल्याचा त्याच्यावर आरोप आहे.

दुसऱ्या प्रकरणात किरण भास्कर शिंदे (वय २७, रा. सोनई, ता. नेवासा) याच्याविरुद्ध गुन्हा रजि. क्र. १४९/२०२६ अन्वये याच कलमांनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. भाविकांच्या वाहनांना अडवून त्यांना आपल्या दुकानातून पूजा साहित्य घेण्यास प्रवृत्त केल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. दोन्ही प्रकरणांत पोलिस कॉन्स्टेबल रविकांत बाबासाहेब गर्जे यांनी फिर्याद दिली आहे. वरिष्ठांच्या आदेशाने ग्रेड पोलिस उपनिरीक्षक कारखेले पुढील तपास करीत आहेत.

## उंबरगाव शिवारात बिबट्याचा धुमाकूळ; दोन कालवडी फस्त

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**श्रीरामपूर** : श्रीरामपूर तालुक्यातील निपाणी-उंबरगाव हद्दीतील कोळसे वस्ती परिसरात बिबट्याने सलग दोन दिवस धुमाकूळ घालत दोन कालवडींचा फडशा पाडल्याची घटना घडली. या प्रकारामुळे परिसरातील शेतकरी, नागरिक तसेच शाळकरी विद्यार्थ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, बिबट्याचा तातडीने बंदोबस्त करून पिंजरा लावण्याची मागणी ग्रामस्थांनी केली आहे. उंबरगाव शिवारातील प्रगतशील शेतकरी वसंतराव कोळसे व शंकरराव कोळसे यांच्या गट क्रमांक ३१/अ/३१ मधील ओपन शेडमध्ये गायी व कालवडी बांधलेल्या होत्या. पहाटेच्या सुमारास बिबट्याने शेडमध्ये घुसून सहा महिन्यांच्या दोन कालवडींवर झडप घातली. दोन्ही कालवडींना ओढत नेऊन लगतच्या उसाच्या शेतात त्यांचा फडशा पाडला. सलग दोन दिवस ही घटना घडल्याने निपाणी वडगाव, उंबरगाव व कोळसे वस्ती परिसरात दहशतीचे वातावरण आहे. बिबट्याचा कायमस्वरूपी बंदोबस्त करण्याची मागणी आबासाहेब भालेराव, बाबासाहेब देशमुख, रणजित कोळसे, मनोज कोळसे, सोपानराव कोळसे यांच्यासह ग्रामस्थांनी केली आहे. वनविभागाचे बडे यांनी घटनास्थळी पंचनामा केला.

## कानिफनाथांचा पालखी सोहळा उत्साहात

### लाखो भाविकांची गर्दी ! नाथांच्या जयकाराने दुमदुमली मढी नगरी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**तिसगाव** : श्री क्षेत्र मढी येथे श्रावण महिण्यातील तिसरा शुक्रवार निमीत्त राज्यातील लाखो भावीकांनी कानिफनाथांच्या पालखी सोहळ्यासाठी गर्दी केली होती. तालबद्ध वाजणारे डफ , फटाक्यांची आताषबाजी ,गुलालाची उधळण ,ढोल-ताशांचा निनाद व कानीफननाथांचा जयजयकाराने मढी नगरी दुमदुमली .अहिल्यानगर जिल्ह्यातील श्रावणातील सर्वात मोठी यात्रा मढीच्या कानिफनाथांच्या पालखी सोहळ्याकडे बघीतले जाते. श्रावण महिन्यात चैतंन्य कानिफनाथांची पालखी प्रतेक शुक्रवारी निघते .



तिसरा श्रावण शुक्रवारी राज्यातील लाखो भाविक चैतन्य कानिफनाथांच्या पालखी सोहळ्यासाठी मढी येथे उपस्थित राहतात . श्रावण तिसरा शुक्रवारी राज्यभरातून आलेले नाथभक्त पायी पालख्यामध्ये सहभागी होऊन नाथांच्या पालखी सोहळ्यासाठी उपस्थीत राहीले. मुंबई, ठाणे, मावळ, नाशिक, लोणावळा, मोशी, आळंदी येथील पालख्या व दिंडया मढी येथे दोन दिवस आगोदरच उपस्थित होत्या. गुरुवारी रात्री पासुनच मढी येथे दर्शनासाठी भावीकांनी गर्दी केली होती. दत्त मंदीर परीसर, यात्रा मैदान, वाहणतळ पुर्ण भरल्याने पालखी मार्गाच्या दोन किमी अंतरावर वाहणांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या.

शुक्रवारी पाहाटे पासुनच राज्याच्या कानाकोपऱ्यातुन आलेल्या पालख्या वादयवृंदासह कानिफनाथ गडावर दाखल झाल्या. विविध फुंलांनी सजवलेल्या पालख्या व रथ येणाऱ्या भावीकांचे लक्ष वेधत होत्या. शुक्रवारी रात्री माहाआरतीनंतर कानिफनाथांच्या मुख्य पालखी वाजत गाजत मिरवनुकीस प्रारंभ झाला. या मिरवणुकीत मराठे सरदार कान्होजी आंग्रे यांनी अर्पण केलेला पंचधातुचा घोडा व भगवा भव्य ध्वज असतो. संपुर्ण गावाला ग्रामप्रदक्षणा करून पुन्हा गडावर विसर्जन झाले.मध्यरात्रीपर्यंत मिरवणुक सुरु होती. कानिफनाथांच्या पालखी मिरवणुकीत सर्व जातीधर्माचे भक्त सहभागी होतात.

मढी गावातील तरूणांनी पालखी मिरवणुकीत उत्सहाने सहभाग घेत स्थानिक वादयाची शोभा वाढवली .कानिफनाथांच्या पालखी सोहळ्यासाठी राज्यभरातून आलेले बॅड पथक, ढोल ड्रंम व विविध इलेक्ट्रॉनिक वादय वाजवत सर्वांचे लक्ष वेधले. कानिफनाथ संजवनी समाधी मंदीराचा गाभारा ,सभामंडप ,कानिफनाथांचे मुख्य मंदिर, तसेच सर्वच ठिकाणी विविध रंगांच्या आकर्षक फुले व फुग्यानी वैशिष्ट्यपूर्ण केलेली सजावट भाविकांचे लक्ष वेधत होती. मढी देवस्थान समितीच्या वतीने पालखी मार्गावर सुशोभीकरण व आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली होती. पालखी उत्सवासाठी येणाऱ्या भाविकांचे मढी देवस्थान समितीकडून स्वागत करण्यात आले.

## विवाहबाह्य संबंधासाठी महिलेवर दबाव मानसिक त्रासातून विवाहितेची आत्महत्या

### पाच जणांविरुद्ध गुन्हा; साकूरमध्ये काही काळ तणाव

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**झरेकाठी** : विवाहबाह्य संबंध ठेवण्यासाठी सातत्याने दबाव व धमकी दिल्याने मानसिक नैराश्यातून एका विवाहित महिलेने आत्महत्या केल्याची घटना संगमनेर तालुक्यातील साकूर परिसरात घडली. याप्रकरणी मांडवे बुद्रुक येथील लोहटे कुटुंबातील पाच जणांविरुद्ध घारगाव पोलिस ठाण्यात आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मृत महिलेच्या दिराने दिलेल्या फिर्यादीनुसार, विश्वास भाऊसाहेब लोहटे हा साकूर परिसरात राहणाऱ्या महिलेला विवाहबाह्य संबंध ठेवण्यासाठी सतत धमकावत होता. तसेच त्याचे वडील भाऊसाहेब नामदेव लोहटे, आई विमलबाई भाऊसाहेब लोहटे, भाऊ बाळासाहेब भाऊसाहेब लोहटे आणि सऱ्याबापू भाऊसाहेब लोहटे यांनी त्याला या कृत्यास प्रोत्साहन दिल्याचे फिर्यादीत नमूद आहे. त्यानुसार पाचही आरोपींवर भारतीय न्याय संहितेच्या कलम १०८, ३(५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शुक्रवारी, दि. २८ ऑगस्ट रोजी सकाळी साकूर येथील मांगमळई रोडलगत वनक्षेत्रात एका महिलेचा झाडाला गळफास घेतलेल्या अवस्थेतील मृतदेह वाटसरूंना आढळून आला. माहिती मिळताच घारगाव पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठविला. काही तासांतच महिलेची ओळख पटली.

तिच्याबाबत आळेफाटा पोलिस ठाण्यात बेपत्ता असल्याची नोंद होती. संगमनेर विभागाचे पोलिस उपअधीक्षक डॉ. कुणाल सोनवणे, घारगावचे पोलिस निरीक्षक बाबासाहेब बोरसे व तालुका पोलिस निरीक्षक साळुंखे यांनी नातेवाईकांना कायदेशीर प्रक्रिया समजावून सांगत परिस्थिती नियंत्रणात आणली. आरोपींना लवकरात लवकर अटक करण्याचे आश्वासन मिळाल्यानंतर नातेवाईकांनी मृतदेह ताब्यात घेतला.

#### मृतदेह ताब्यात घेण्यास नातेवाईकांचा नकार

महिलेच्या मृत्यूला विश्वास लोहटे जबाबदार असल्याचा आरोप करत नातेवाईकांनी आरोपीला अटक करण्याची मागणी केली. आरोपीला अटक होत नाही तोपर्यंत मृतदेह ताब्यात घेणार नसल्याची भूमिका घेतल्याने पोलिस ठाण्यात काही काळ तणाव निर्माण झाला.

#### चर्चेतून परिस्थिती नियंत्रणात

सामाजिक कार्यकर्ते कोंडाजी कुदनर, एकनाथ खेमनर तसेच भाजप अल्पसंख्याक मोर्चाचे जिल्हाध्यक्ष रौफभाई शेख यांनी नातेवाईक व पोलिस प्रशासनाशी चर्चा करून परिस्थिती शांत केली. रात्री उशिरा गुन्हा दाखल करण्यात आला. त्यानंतर मृतदेहावर अंत्यसंस्कार करण्यात आले. प्रकरणाचा पुढील तपास घारगाव पोलिस करीत आहेत.